मराठे प्रतिष्ठान मुंबई यांचे मुखपत्र

परस्परं भावयन्तः

म प्र

# हितगुज

अंक ६४ ● संपादक : लक्ष्मण शंकर (पृष्ठ ५२०) ● डिसेंबर २००५

(व्यक्तींची नावे देताना 'मराठे' आडनाव वगळले असून कंसात कुलवृत्तांतातील माहितीचा पृष्ठ क्रमांक दिला आहे.)

(फक्त खाजगी वितरणासाठी)

## आवाहन : 'रक्ताचे' नाते जोडूया

अनेक आजारांना तोंड देण्याकरता अर्थसहाय्याबरोबर मनुष्य बळ व इतर छोट्या-छोट्या मदतीशिवाय रक्ताची नितांत आवश्यकता असते. ही आवश्यकता लक्षात घेऊन आपल्याच कुलबांधवांसाठी मराठे कुलबांधवांनी पुढे येऊन आपल्या घरातील प्रत्येक व्यक्तींचे रक्तगट व संपर्कासाठी फोन व पत्ता 'मराठे प्रतिष्ठान'कडे सूचि तयार करण्याकरता कळवावा म्हणजे गरजू कुलबांधवांना याबाबत विचारणा करता येईल. एक प्रकारे 'रक्ताचे' नाते तयार होऊन बंधूभावाची वीण घट्ट होईल आणि मराठे प्रतिष्ठानच्या 'परस्परं भावयन्तः' या ब्रीद वाक्याची सार्थकता पटेल. हे नुसते आवाहन न करता याची सुरवात माझ्यापासूनच करतो. - **महेश अनंत** (पृ.५२८), बी-१३ अमोल सोसायटी, अच्चुतराव पटवर्धन मार्ग, मुलुंड (पूर्व), मुंबई ४०० ०८१. फोन : २५९१२९४८

| | |
|---|---|
| श्री. महेश अनंत | रक्तगट O+ve |
| सौ. माधवी महेश | रक्तगट B+ve |
| कु. राधिका महेश | रक्तगट O+ve |

*कुलबांधवांनी अशी माहिती कळवावी. प्रत्येक अंकांत ती प्रसिद्ध केली जाईल. - संपादक*

***

## मराठे प्रतिष्ठान डायरीबाबत निवेदन

मराठे प्रतिष्ठान पुणे शाखेने यंदा २००६ सालची डायरी काढण्याचे ठरविले आहे. या डायरीत सर्व उपयुक्त माहिती, आंबेजोगाई व व्याडेश्वरचा फोटो आणि माहिती, बोडणाची रांगोळी व माहिती, १६ संस्कारांची माहिती, आर्थिक गुंतवणूक व कर भरण्यासंदर्भात मार्गदर्शनपर माहिती अशा विविध विषयांवरील उपयुक्त माहितीचा समावेश केलेला आहे.

या डायरीमध्ये प्रत्येक दिवसासाठी (शनिवार, रविवारसाठीहि) पूर्ण पान आहे. ही डायरी तयार करताना पृष्ठदानाची कल्पना राबवली आहे. त्यात पृष्ठदात्याचे पत्ते दिले आहेत. त्यामुळे या डायरीमार्फत तुम्ही अनेक कुलबांधवांशी संपर्क साधू शकाल.

डायरीची किंमत रु. १०० आहे. सर्व कुलबांधवांनी जास्तीत जास्त **डायऱ्या विकत घेऊन आप्तस्वकीयांना द्याव्या** अशी विनंती आहे.

डायरी नीट पहावी व **आपले अभिप्राय, सूचना किंवा काही तक्रारी असल्यास जरूर कळवाव्या**. त्यामुळे पुढील वर्षीच्या डायरीत सुधारणा करणे सुलभ होईल.

२५ डिसेंबर प्रकाशन समारंभानंतर डायऱ्या विक्रीसाठी उपलब्ध होऊ शकतील. तरी डायऱ्या विकत घेण्यासाठी प्रत्यक्ष संपर्क साधावा किंवा पुण्यातील नातेवाईकांना घेण्यास पाठवावे. पत्ता - **सौ. नीलांबरी मराठे,** ६४२ नारायण पेठ, प्राथमिक नू.म.वि. समोर, अप्पा बळवंत चौक, पुणे ३०. (फोन : २४४५६२७०)

पुणे शाखेतर्फे जाहीर निमंत्रण

### डायरी प्रकाशन व वर्धापन दिन समारंभ

मराठे प्रतिष्ठान पुणे शाखेतर्फे काढण्यात येणाऱ्या २००६ सालच्या डायरीचा प्रकाशन समारंभ व मराठे प्रतिष्ठानचा २६ वा वर्धापन दिन असे दोन्ही कार्यक्रम एकत्रितरीत्या **रविवार दिनांक २५ डिसेंबर २००५ रोजी** दुपारी ४ ते रात्री ८ वा. गांधर्व महाविद्यालय, दक्षिण मुखी मारुती जवळ, मंत्री हाईटस्, शनिवार पेठ, पुणे ४११०३० येथे करण्याचे ठरवले आहे. यामध्ये प्रसिद्ध हार्मोनियम वादक श्री. प्रमोद धुंडीराज मराठे यांचा हार्मोनियम वादनाचा बहारदार कार्यक्रम, प्रकाशन समारंभ व सौ. अनिता रघुनाथ मराठे व त्यांच्या सहकाऱ्यांचा सुगम संगीत आणि देवीची रूपे असा आकर्षक कार्यक्रम आयोजित केला आहे. तरी आपण शेवटपर्यंत थांबून या कार्यक्रमाचा आस्वाद घ्यावा ही विनंती.

मराठे प्रतिष्ठान

पब्लिक ट्रस्ट नोंदणी क्र. ई. ७९१८ (मुं. ता. १२/१/१९८१)

मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५. दूरध्वनी : २४३०२४५३.

वेबसाईट : www.marathepratishthan.org

# प्रतिष्ठान वृत्त

**कार्यकारी मंडळ**

प्रत्येक महिन्याच्या **दुसऱ्या शनिवारी सायंकाळी ४ वाजता** कार्यकारी मंडळाची सभा होते. सभेच्या दिवशी कोणीहि सभासद कार्यकारी मंडळाला भेटण्यासाठी येऊ शकतो.

मागील तिमाहीत **२५ सप्टेंबर, ८ ऑक्टोबर आणि ११ नोव्हेंबर रोजी कार्यकारी मंडळाच्या सभा झाल्या.** २५ सप्टेंबर रोजी प्रतिष्ठानची वार्षिक सर्वसाधारण सभा असल्याने त्याच जागी (दामले योग केंद्र सभागृह, माटुंगा रोड, प. रेल्वे येथे) सर्वसाधारण सभेपूर्वी कार्यकारी मंडळाची सभा घेण्यात आली. प्रतिष्ठानला देणग्या देणाऱ्यांना आयकरात सवलत मिळण्यासाठी अर्ज करण्यापूर्वी प्रतिष्ठानच्या **घटनेत काही बदल** करणे आवश्यक असल्याचे दिसून आले. यासंबंधात कार्योपाध्यक्ष विद्वांस यांचे मित्र अनुभवी तज्ज्ञ **ॲडव्होकेट विजय पटवर्धन यांचे मार्गदर्शन** घेण्यात आले होते, त्यांनी समक्ष सर्वसाधारण सभेत याबाबतची माहिती सर्व सदस्यांना द्यावी म्हणून त्यांना सर्वसाधारण सभेत आमंत्रित करण्याचे कार्यकारी मंडळ सभेत ठरविण्यात आले.

कार्याध्यक्ष आनंदराव मराठे यांना अन्य महत्त्वाच्या कामामुळे उपस्थित राहणे शक्य नसल्याने **८ ऑक्टोबरची सभा** कार्योपाध्यक्ष रमाकांत विद्वांस यांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्या घरी झाली. या सभेत कुलवृत्तांच्या १० प्रती झेरॉक्स करून घ्याव्या व इच्छुक सभासदांना रु. ६०० किमतीला पुरवाव्या असे ठरविण्यात आले. यासाठी अंदाजे रु. ५०० खर्च मंजूर करण्यात आला. तसेच वेंगुर्ले येथील **साप्ताहिक 'किरात'चे संपादक श्रीधर केशव** यांना हरिभाऊ वर्तक फौंडेशन ट्रस्ट तर्फे कोकण विभागातून उत्कृष्ट पत्रकारितेचा पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात आले. याच सभेत **का. मं. सदस्य चिंतामणि महादेव** यांनी सालाबादप्रमाणे पितृपंधरवड्यानिमित्त शिक्षण निधीसाठी **रु. ५०१ ची पितृस्मृती देणगी** दिली तिचा स्वीकार करण्यात आला. **शैलजा चक्रदेव** यांनी शिक्षण निधीला दिलेल्या रु. १००० च्या देणगीचाहि स्वीकार करण्यात आला.

**११ नोव्हेंबरची सभा** ठाणे येथे लक्ष्मीकेशव कार्यालय येथे घेण्यात आली. कार्याध्यक्ष आनंदराव मराठे यांच्या नातवाच्या मुंजीनिमित्त पुण्या-मुंबईचे कार्यकारी मंडळ सदस्य तिथे जमणार असल्याने शनिवारऐवजी एक दिवस आधी ही सभा घेण्यात आली. सर्वसाधारण सभेतील चर्चेच्या अनुषंगाने प्रतिष्ठानच्या घटनादुरुस्तीचा मसुदा मान्य करण्यात आला आणि महिनाभरात घटनादुरुस्तीसाठी विशेष सर्वसाधारण सभा बोलवावी असे ठरविण्यात आले. तसेच 'होय, मला लग्न करायचंय' या सप्टेंबर अंकात जाहीर केलेल्या स्पर्धेनुसार एकाच वाचकाचे लेखन प्राप्त झाल्याचे वामन गणेश यांनी सांगितले. मात्र लेखकाचे विचार बक्षीसपात्र वाटल्याने **सुनील सदानंद विद्वांस,** जन्म २१.१०.१९८०, मुद्देबुद्रुक, कचेरी टेकडा जवळ, कर्जत, जि. रायगड यांना **१ले पारितोषिक रु. ५००** देण्याची शिफारस 'वा. ग.' यांनी केली, ती कार्यकारी मंडळाने मान्य केली. (सदर लेख या अंकात प्रसिद्ध करण्यात आला आहे.)

> **म. प्र. वेबसाईटचा उपयोग**
>
> मी आमच्या म्हणजे मे. यशवंत विठ्ठल मराठे प्रा. लि. च्या ऑफिसमध्ये 'इंटरनेट' वर बसलो होतो. तेवढ्यात श्री. गद्रे गुरुजी ऑफिसमध्ये आले. 'हितगुज' वर 'मराठे प्रतिष्ठान' च्या वेबसाईटचा पत्ता पाहून ती साईट पहाण्याची इच्छा व्यक्त केली. मी लगेच साईट ओपन केली. त्यातील एकेक पान पाहून ते चांगलेच प्रभावित झाले.
>
> तेवढ्यात त्यांना 'कुलाचार' हे नांव वर दिसले. शेवटी ते गुरुजीच असल्याने त्यांनी लगेचच ते पान ओपन करायला सांगितले. त्यातील 'बोडण' संबंधीची सविस्तर माहिती पाहून एकदम थक्कच झाले. त्यातला काही भाग त्यांनाही नवीनच होता. ती सर्व शास्त्रशुद्ध माहिती त्यांनी आपल्याकडे ठेवून घेतली आहे. ते म्हणाले ह्याचा मला पर्यायाने आपल्या समाजाला चांगलाच उपयोग होईल.
>
> आपण केलेल्या ह्या चांगल्या कामाची समाज कशी कदर करतो हे समजले की काम करणाऱ्यास हुरूप येतो म्हणून हा पत्र प्रपंच केला. - **प्र. ना. कुलकर्णी,** ठाणे

**वास्तुप्रकल्प**

मागील अंकात प्रतिष्ठानच्या वास्तुप्रकल्पाचा तपशील देऊन यासाठी निधी उभारणीचे आवाहन करण्यात आले होते. २५ सप्टेंबर रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत याबाबत सविस्तर चर्चा झाली. सर्व सभासदांनी या कल्पनेचे स्वागत केले. यासाठी केवळ **२०० सभासदांनी प्रत्येकी रु. २५,००० ठेव म्हणून दिले तरी ५० लाखांचे उद्दिष्ट साध्य होऊ शकेल.** कुलबांधवांनी **तातडीने** आपला सहभाग प्रतिष्ठानकडे पाठवावा. या योजनेचा पाठपुरावा करण्याची प्रमुख जबाबदारी खालील तीन कार्यकारी मंडळ सदस्यांनी स्वीकारली आहे.

१. **रमाकांत माधव विद्वांस,** कार्योपाध्यक्ष, फ्लॅट नं. ३१, गुडविल अॅश्युरन्स बिल्डींग, मनमाला टँक रोड, माहीम, मुंबई ४०००१६. फोन : २४३०५२६०, २४३२४८४०. सेल : ९८२०२२४०१४

२. **प्रभाकर दामोदर मराठे,** कोषाध्यक्ष, ८/१३, सहकार नगर, वडाळा (प.), मुंबई ४०००३१. फोन : २४१५०८८९. सेल : ९८२०२३२०८२.

३. **हेमंत महादेव मराठे,** २/१८, शिवानंद सोसायटी, विलेपार्ले (पूर्व), मुंबई ४०००५७. फोन : २६१७७७५७, २६१५२८७४.

**अमेरिकेतील 'राज'दूत**

ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये कार्यकारी मंडळ सदस्य **पुष्क'राज' वामन** (पृ.५०३) कार्यालयीन कामानिमित्त अमेरिकेत गेले होते. तेथे त्यांनी बऱ्याच कुलबांधवांसी संपर्क साधला आणि वास्तुप्रकल्पाला मदत करण्याबाबत त्यांच्याशी प्राथमिक बोलणी केली. डिसेंबर-जानेवारी मध्ये ते पुनश्च अमेरिकेत जाणार असून यावेळी प्रत्यक्ष रक्कम हातात पडेल अशी त्यांना खात्री वाटते. *(पुढे पृ.५ वर....)*

# सभासद वृत्त

**मानसन्मान**

### नवचैतन्य प्रकाशनाचा रौप्यमहोत्सव

दि. १३ नोव्हेंबर २००५ ला बोरिवली येथे, 'नवचैतन्य' प्रकाशन या मराठे **सौ. सुप्रिया व शरद कृष्णाजी** (पृ.३३७) या दाम्पत्याच्या प्रकाशन संस्थेचा रौप्यमहोत्सवी सोहळा दिमाखदारपणे साजरा झाला. कार्यक्रमाचे अध्यक्ष होते पत्रकार श्री. कुमार केतकर तर प्रमुख पाहुण्या होत्या डॉ. स्नेहलता देशमुख.

''हौशी वृत्ती असल्याशिवाय असा ऐटबाज सोहळा होणे नाही. श्री. शरद बोलतात कमी जण कृती करतात, महत्त्वाचं म्हणजे लेखकाच्या हातात पाकीट देतात'' असे कौतुकोद्‌गार श्री. शं. ना. नवरे यांनी काढले. प्रवचनकार सु. ग. शेवडे यांनी आशीर्वादपर भाषण केले. रसिक श्रोत्यांनी तुडुंब भरलेले सभागृह पाहून आज जणू साहित्य संमेलनच भरले आहे, असे कवी प्रवीण दवणे यांनी म्हटले. एक आवृत्ती संपली, दुसरी काढतोय असे भाग्य लेखकाला देणारे हे प्रकाशक आहेत. पैशाला अर्थ देणारी ही माणसं आहेत असा त्यांनी मराठे दाम्पत्याचा गौरव केला.

या कार्यक्रमात नवे-जुने लेखक एकत्र आले. अनेक लेखकांच्या साहित्यकृतींचे प्रकाशन झाले. साहित्यिकांचा स्मृतिचिन्ह देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. त्याप्रमाणेच २५ वर्षांच्या वाटचालीत 'नवचैतन्य' प्रकाशनाला लाभलेले चित्रकार, मुद्रक, बाईंडर, मुखपृष्ठकार, ग्रंथव्यवहार चालविणारे ग्रंथविक्रेते या सर्वांचा सत्कार करण्यात आला.

मराठी माणूस नोकरी 'करतो' आणि धंद्यात 'पडतो' असे म्हटले जाते. कोणताही धंदा सोपा नाही. प्रकाशनाचा तर नाहीच नाही. पण जिद्द, मेहनत, प्रामाणिकपणा या गुणांमुळेच मराठे दाम्पत्य प्रकाशन व्यवसायात पाय रोवून उभे आहेत. त्यांची सुवर्णमहोत्सवी आणि त्यानंतर अमृतमहोत्सवी यशाकडे अशीच घोडदौड चालू राहो अशा मराठे परिवारातर्फे शुभेच्छा. (प्रेषक : **डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर,** पृ.१२०, वडाळा, मुंबई.

### 'भवानी भारती'चा मराठी अनुवाद

महर्षि अरविंद लिखित 'भवानी भारती' या संस्कृत काव्याचा मराठी अनुवाद निवृत्त जिल्हा न्यायाधीश **अरुण भिकाजी** (पृ.५१२), बडोदे यांनी केला आहे. या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ पुणे येथे, आबासाहेब गरवारे महाविद्यालयात (A. V. Hall) ८ ऑक्टोबर २००५ रोजी मोठ्या दिमाखात साजरा झाला. प्रकाशन समारंभाच्या वेळी 'भवानी भारती' मधील दहा श्लोकांचे सुश्राव्य गायन प्रज्ञा मराठे हिने केले. सदर पुस्तकाची किंमत आहे रु. ५०. **पुस्तकासाठी संपर्क** :

१) **पुणे - सौ. स्वाती भुस्कुटे,** ५०४ बी, शनिवार पेठ, मन:शांती अपार्टमेंट, मेहुणपुरा, पुणे ४११ ०३० (फोन : ०२६५-२६४२८८७).

२) **बडोदा - अरुण भिकाजी मराठे,** 'अभिराम', नीलकंठ पार्क, मांजलपूर, बडोदा ३९००११ (फोन : ०२६५-२६४२८८७)

---

### चिंतामणि बळवंत हस्ताक्षर स्पर्धा

माझे वडील कै. चिंतामणि बळवंत (पृ.१२८) हे स्थापनेपासून १९८९ सालापर्यंत पुणे शाखेचे कार्य करत होते. त्यांचे १९९४ साली निधन झाले. त्यांच्या स्मरणार्थ मी प्रत्येक वर्षी जानेवारी व जुलै मध्ये (जन्मदिनी व स्मरणदिनी) शिक्षण निधीकरता प्रतिष्ठानकडे देणगी देत असतो.

माझ्या वडिलांचे हस्ताक्षर चांगले होते. चांगल्या हस्ताक्षराचे ते कायमच कौतुक करत असत. त्यांच्या स्मरणार्थ मराठे प्रतिष्ठान, पुणे शाखेतर्फे त्यांच्या नावे दरवर्षी जानेवारीमध्ये हस्ताक्षर स्पर्धा आयोजित करण्याची इच्छा आहे. स्पर्धेला वयाची अट नाही. स्पर्धकांनी **मराठी अथवा इंग्रजी हस्ताक्षर १० ओळी** स्पर्धेकरता माझ्या घरच्या पत्त्यावर अथवा मराठे प्रतिष्ठान पुणे शाखेकडे **३१.०१.२००६ च्या आत** पाठवणे.

वरील स्पर्धेचा निकाल हितगुज मार्चच्या अंकात जाहीर केला जाईल. बक्षिसे पोस्टाने पाठवली जातील. उत्कृष्ट हस्ताक्षरास पहिले बक्षीस रु. २५०, दुसरे बक्षीस रु. १५० व तिसरे बक्षीस रु. १००. - **गजानन चिंतामणि मराठे,** प्लॉट नं. ३४ अ, 'सार्थक', सेनादत्त कॉलनी, पुणे ४११०३०. फोन : २४३३१६५१

---

### अमृत महोत्सवी कुलज्येष्ठ

१) मुंबईतील सभासद **शंकर कृष्णाजी** (पृ.३९७) यांना २०.९.२००५ रोजी ७५ वर्षे पूर्ण झाली. तसेच पुण्यातील सदस्य **गजानन चिंतामण यांची आई सुशिलाबाई** (पृ.१२२) यांनाहि ३०.४.२००५ रोजी ७५ वर्षे पूर्ण झाली.

या दोन्ही कुलज्येष्ठांना दीर्घायुरोग्य लाभो अशी मराठे परिवारातर्फे शुभेच्छा.

### अरुणा मराठे - क्राऊन प्रॉसिक्युटर फॉर द सिटी ऑफ कॅलगरी

प्रतिष्ठानचे **सदस्य डॉ. एकनाथ व्यंकटेश, अमेरिका (पृ.३८९) यांची मुलगी अरुणा,** बॅरिस्टर आणि सॉलिसिटर हिने Crown Prosecutor for the City of Calgary हे पद स्वीकारले आहे. या बहुमानाबद्दल अरुणाचे मराठे परिवारातर्फे अभिनंदन.

### न्यू एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्षपदी श्रीधर केशव

१६ ऑक्टोबर २००५ रोजी झालेल्या उभादांडा येथील न्यू एज्युकेशन सोसायटीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत वेंगुर्ले येथील **'किरात' साप्ताहिकाचे संपादक श्रीधर केशव** (पृ.३९६) यांची संस्थेचे अध्यक्ष म्हणून सर्वानुमते निवड करण्यात आली.

### किरातकारांना भाऊसाहेब वर्तक फौन्डेशनचा पुरस्कार

'किरात'चे संपादक **श्रीधर केशव (पृ.३९६) यांना** पद्मश्री भाऊसाहेब वर्तक फौन्डेशन ट्रस्टचा **कोकण विभागातून उत्कृष्ट पत्रकारितेबद्दल पुरस्कार देण्यात आला आहे.** वसई येथील लोकनेते पद्मश्री भाऊसाहेब वर्तक यांच्या नावे कोकणच्या विकासासाठी झटणाऱ्या किंवा कार्यकर्तृत्वाने कोकणचे नाव उज्वल करणाऱ्या कोकणातील स्थायिक एक व्यक्ती आणि एक संस्था यांना दरवर्षी पुरस्कार देऊन

त्यांचा गौरव केला जातो.

हा पुरस्कार मिळाल्याबद्दल श्रीधर मराठे यांचा ३० ऑक्टोबर २००५ रोजी वेंगुर्ले नगरवाचनालय सभागृहात वेंगुर्ले नगरवाचनालय आणि कोकण मराठी साहित्य परिषद वेंगुर्ले शाखा यांच्यातर्फेहि सत्कार करण्यात आला.

**आदर्श शिक्षक रघुनाथ गोविंद**

इंद्रायणी महाविद्यालय, तळेगाव दाभाडे, जि. पुणे येथे गेली ३३ वर्षे इंग्लिश विषयाचे प्राध्यापक म्हणून कार्यरत असलेले प्रतिष्ठानचे **पुण्यातील सभासद रघुनाथ गोविंद** (पृ.१९९) ह्यांना ह्या वर्षाचा ''आदर्श शिक्षक'' पुरस्कार तळेगाव दाभाडे शिक्षण मंडळातर्फे जाहीर करण्यात आला. पुरस्कार प्रसिद्ध साहित्यिक श्री. प्रवीण दवणे ह्यांच्या हस्ते नुकताच प्रदान करण्यात आला. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना इंग्लिश विषय सोपा करुन सांगणे व त्याच्यात आवश्यक तो आत्मविश्वास निर्माण करणे हे रघुनाथ गोविंद ह्यांच्या शिकविण्याचे वैशिष्ट्य. त्यांना प्राप्त झालेल्या या पुरस्काराबद्दल मराठे परिवारातर्फे त्यांचे अभिनंदन. (प्रेषक - **सौ. अनिता रघुनाथ,** पुणे)

**पूजा मराठे, मानसी फाटक यांचे अरंगेत्रम**

प्रसिद्ध हार्मोनियम वादक **पुण्याचे प्रमोद धुंडिराज यांची पुतणी पूजा चंद्रशेखर** (पृ.१२८) आणि प्रतिष्ठानच्या पुणे शाखेच्या कार्यकर्त्या सौ. नीलांबरी मराठे यांच्या आतेसासूबाई सौ. शांता जोशी (दत्तात्रय गोविंद, पृ.२८० यांची पुतणी) यांच्या मुलीची मुलगी **मानसी वसंत फाटक** या दोघींनी पुण्यात टिळक स्मारक मंदिरात रविवार दि. ६ नोव्हेंबर २००५ रोजी थाटामाटात सादर केले. त्या दोघीहि गेली १२ वर्षे मुद्रा नृत्यालयात सौ. उज्ज्वला पेंडसे यांच्याकडे कथ्थक नृत्यशिक्षण घेत आहेत. दोघींनीहि अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालयातून नृत्यविशारद पदवी संपादन केली आहे.

त्या दोघीही उच्चविद्याविभूषितहि आहेत. पूजा सध्या M.Com व ICWA II Part करीत आहे. नृत्याचे शिक्षण व त्याचा प्रसार करण्याचा तिचा मानस आहे. पुणे फेस्टिवलमध्येहि तिने आपली कला सादर केली आहे. मानसी B.Com झाली आहे. ती जर्मनहि शिकली आहे. नृत्यामधून M.A. करावे आणि परदेशात नृत्याचा प्रसार करावा असा तिचा इरादा आहे.

दोघींचेहि त्यांच्या आतापर्यंतच्या यशाबद्दल मराठे प्रतिष्ठानतर्फे अभिनंदन आणि पुढील वाटचालीसाठी सर्व मराठे परिवारातर्फे शुभेच्छा. (प्रेषक : **सौ. नीलांबरी रमेश,** पृ.२८०, पुणे)

खुषीपत्र **'ऋणानुबंध'**

माझ्या मुलाला काही काळासाठी बंगलोरला राहायचे होते. बंगलोरहून श्री. गजानन मराठे तसेच चित्पावन ब्राह्मण संघाचे अध्यक्ष श्री. भालचंद्र डोंगरे हेही खास निमंत्रित म्हणून गोवा संमेलनाला आले होते. मी माझी समस्या त्यांच्यासमोर मांडली आणि प्रश्न चुटकीसरशी सुटला. डोंगरे साहेब म्हणाले, 'अहो, बंगलोरमध्ये आपला भाऊच आहे. तो Paying guest ठेवून घेतो. आपल्या गजाननरावांना सोबत घेऊन त्याच्याकडे चला. काम होईल.'

आणि अस्मादिकांचे पुत्र बंगलोरला रवाना झाले. तिथे पोचल्यावर गजाननरावांशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधला व ते संध्याकाळी श्री. अरविंद डोंगरे यांच्या घरी गेले. तिथे सर्व व्यवस्था अगदी उत्तम झाली. माणसे खूप चांगली मिळाली. अगदी आपुलकीने, आपल्या कुटुंबातलाच मानून, सर्व काही करतात. यालाच म्हणतात ऋणानुबंध. प्रतिष्ठानची मी ऋणी आहे व राहीन. - **सौ. शुभदा दीपक** (पृ.५३३), शिरोडा-गोवा.

**पदोन्नती - गजानन चिंतामण**

**पुण्यातील प्रतिष्ठानचे सभासद गजानन चिंतामणि** (पृ.१२९) इन्कम टॅक्स ऑफिसमध्ये काम करतात. ६.५.२००५ पासून त्यांना राजपत्रित अधिकारी वर्ग २ चे प्रमोशन मिळाले आहे. प्रतिष्ठानतर्फे अभिनंदन.

**मिलिंद सुधाकर - विभागप्रमुख**

पुण्यातील सभासद गजानन चिंतामण यांचे चुलत बंधु **मिलिंद सुधाकर** (पृ.१२९), B.E. (Electrical) हे सोमय्या कॉलेजमध्ये प्राध्यापक आहेत. त्यांना एप्रिल २००५ पासून विभागप्रमुख इलेक्ट्रिकल डिपार्टमेंट म्हणून प्रमोशन मिळाले आहे. प्रतिष्ठानतर्फे अभिनंदन.

**अभिजित अशोक - BE (Electrical)**

प्रतिष्ठानचे मुंबईतील सभासद **गजानन भास्कर यांचा नातू अभिजित अशोक** (पृ.४२७) बी.ई. इलेक्ट्रिकल परीक्षा ७५% गुण मिळवून डिस्टिंक्शनमध्ये उत्तीर्ण झाला. उज्ज्वल यशाबद्दल अभिजितचे मराठे परिवारातर्फे अभिनंदन.

**अजित अशोकला शिष्यवृत्ती**

प्रतिष्ठानचे गोव्यातील सदस्य **अशोक रामचंद्र यांचा मुलगा अजित** (पृ.१८८) याला M.S. करण्यासाठी अमेरिकन विद्यापीठात शिष्यवृत्ती मिळाली आहे. त्याने युनिव्हर्सिटी ऑफ मिनिसोटा येथे प्रवेश घेतला आहे. M.S. मध्ये उज्ज्वल यशासाठी मराठे परिवारातर्फे शुभेच्छा.

**शीतल गजानन - M.Com**

पुण्यातील सभासद **गजानन चिंतामण यांची मुलगी शीतल** (पृ.१२९) मे २००५ मध्ये झालेल्या M.Com परीक्षेत द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाली. सर्व मराठे परिवारातर्फे अभिनंदन.

**अपत्यप्राप्ती**

पुण्यातील सभासद गजानन चिंतामण यांचे चुलत बंधु **अजित चंद्रकांत (पृ.१२०) व पत्नी सौ. स्मिता यांना** २६.२.२००५ रोजी **कन्यारत्न** झाले. तिचे नाव आहे श्वेता.

**कुर्यात् बटोर्मंगलम्**

प्रतिष्ठानचे **कार्याध्यक्ष आनंद यशवंत, यांचा नातू तन्मय शंतनु** (पृ.२७७) याचा व्रतबंध दि. ११ नोव्हेंबर २००५ रोजी ठाणे येथील लक्ष्मीकेशव कार्यालयात मोठ्या दिमाखदारपणे करण्यात आला. बटूला आशीर्वाद देण्यासाठी प्रतिष्ठानचे पुण्यामुंबईतील पदाधिकारी आवर्जून उपस्थित राहिले होते.

**सहवेदना**

१. पुण्यातील सभासद **प्रसिद्ध हार्मोनियमवादक प्रमोद धुंडिराज यांचे काका अनंत गोविंद** (पृ.१२९) यांचे २९.४.०५ रोजी निधन झाले. महिनाभरापूर्वीच ११.३.०५

रोजी त्यांच्या वयाला ७५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल त्यांचा मुलगा, सून, पुतणे, नातू, नातसुना यांनी गाण्याचा कार्यक्रम आयोजित केला होता. त्यांचे सारे घरच गाणाऱ्यांचे. अनंतराव १९९३ पासून पुण्यातील गांधर्व महाविद्यालयाचे प्राचार्य होते. तत्पूर्वी ते उपप्राचार्य होते, त्यांचे वडिल बंधु धुंडिराज गोविंद प्राचार्य होते. गांधर्व महाविद्यालय हे जणु त्यांचे दुसरे घरच होते. ४०व्या वर्षी लग्नापर्यंत त्यांचा मुक्काम तिथेच असे.

नातेवाईक त्यांना काका म्हणून ओळखत. गांधर्व महाविद्यालयाबरोबरच पुण्यातील कोथरूडमधील 'सरगम' या संगीत विद्यालयांतहि ते शिकवत. संगीत हीच त्यांची जीवननिष्ठा होती. विद्यार्थ्यांना शास्त्रशुद्ध संगीत शिकवणे हा एकमेव ध्यास होता. त्यांनी स्वत:चा रियाझहि कधी चुकवला नाही. बाहेरगावी, अगदी परदेशात जाताना सुद्धा रियाझात खंड पडू नये म्हणून ते तंबोरा मशीन व तबला मशील बरोबर घेऊन जात. ही शिस्त त्यांना गांधर्व महाविद्यालयात मिळाली. आवाजशास्त्राचाहि त्यांनी विशेष अभ्यास केला आणि याबाबत अनेकांना विनामूल्य मार्गदर्शन केले. (प्रेषक : **सौ. गौरी शिकारपूर**, पुणे)

२. प्रतिष्ठानचे **विश्वस्त डॉ. राजेंद्र विठ्ठल यांची आई श्रीमती सुलोचना** (पृ.२९१) यांचे १९.९.०५ रोजी वृद्धापकाळाने देहावसान झाले.

३. मुंबईतील प्रतिष्ठानचे सभासद **श्रीनिवास प्रभाकर यांची पत्नी माधुरी** (पृ.३८९) यांचे २६ सप्टेंबर २००५ रोजी दु:खद निधन झाले. त्या ४७ वर्षांच्या होत्या.

४. पुण्यात राहणारे प्रतिष्ठानचे सदस्य **वामन नारायण यांची पत्नी आनंदी (पृ.५२१)** यांचे २९ ऑगस्ट २००५ रोजी वृद्धापकाळामुळे दु:खद निधन झाले.

५. तुळस, जि. सिंधुदुर्ग येथील कुलबांधव **काशिनाथ परशुराम ऊर्फ ताता मराठे (पृ.४९९)** यांचे नुकतेच दीर्घ आजाराने निधन झाले. ते ८५ वर्षांचे होते.

**सर्व मृतांच्या कुटुंबीयांच्या दु:खात मराठे परिवार सहभागी आहे.**

* * *

***प्रतिष्ठान वृत्त....*** *(पृ.२ वरून)*

**वार्षिक सर्वसाधारण सभा (२५.९.०५)**

प्रतिष्ठानची तेविसावी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. २५ सप्टेंबर २००५ रोजी सायंकाळी ५ वाजता दामले योग केंद्र सभागृह, मनमाला टँक रोड, लोकमान्य नगर जवळ, माटुंगा रोड (प. रेल्वे), मुंबई ४०० ०१६ येथे झाली. या सभेला ॲडव्होकेट विजय पटवर्धन खास निमंत्रित म्हणून उपस्थित होते. तसेच गुणवत्ता पारितोषिके मिळवणारे विद्यार्थी व त्यांचे नातलगहि उपस्थित होते. प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष आनंद यशवंत सभेच्या अध्यक्षस्थानी होते.

वृत्तांतसाली निधन पावलेल्या कुलबंधू-भगिनींना श्रद्धांजली वाहून सभेच्या कामकाजाला सुरवात झाली. उपस्थितांचे मन:पूर्वक स्वागत करून अध्यक्षांनी वर्षभरात त्यांना दिलेल्या सहकार्याबद्दल सर्वांचे आभार मानले आणि यापुढेहि असेच सर्वांचे सहकार्य मिळेल अशी आशा व्यक्त केली.

सभेला प्रतिष्ठानचे **ज्येष्ठ सदस्य शंकर कृष्णाजी** (पृ.३९७) सपत्निक हजर होते. त्यांच्या वयाला २०.९.०५ रोजी ७५ वर्षे पूर्ण झाली. यानिमित्त त्यांनी प्रतिष्ठानला रु. १००१ ची देणगी दिली. सर्व सदस्यांनी उत्स्फूर्तपणे टाळ्या वाजवून त्यांचे कौतुक केले आणि त्यांनी 'शतक' पूर्ण करावे अशी आशा व्यक्त केली.

यानंतर **कार्यवाह मोहन सदाशिव** यांनी सभेची सूचना वाचून सभेच्या रीतसर कामाची सुरवात केली. १० ऑक्टोबर २००४ रोजी झालेल्या २२व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे **इतिवृत्त वाचून सर्वानुमते मंजूर** करण्यात आले.

त्यानंतर २००४-०५ या कालावधीचा **वार्षिक अहवाल आणि नफातोटा पत्रक सभेपुढे** ठेवण्यात आले. याबाबत ताळेबंदामध्ये 'मालमत्ता व येणी' या रकान्यात कर्जाऊ शिष्यवृत्ती (वि. खां. स्मृ. यो. तून) रु. २०,००० अशी नोद आहे. ती स्पष्ट व्हावी म्हणून 'बिनव्याजी परतफेडीचे कर्ज (विनय खांबेटे स्मृती योजनेखाली) रु. २०,०००' अशी शब्दयोजना करावी ही **सदानंद मराठे यांची सूचना मान्य** करण्यात आली.

**विशिष्ट हेतु निधी कशासाठी** असे **गजानन भास्कर** यांनी विचारले असता लक्ष्मण शंकर यांनी सांगितले की कै. श्रीपाद चिंतामणि (पृ.५०३) यांनी त्यांच्या पत्नीच्या स्मरणार्थ रु. ५०,००० देणगी दिली. या रकमेचा वापर मोठ्या खर्चाच्या विशिष्ट आजारावर उपचार करण्यासाठी सभासदांना मदत देण्यासाठी करायचा होता. प्रथम फक्त या मदतीचा आवाका कॅन्सरपुरताच मर्यादित होता, पण पुढे तो हृदयविकारात बायपास शस्त्रक्रिया आणि मूत्रपिंड शस्त्रक्रिया यासाठीहि वाढवण्यात आला. रकमेवरील व्याज मूळ रकमेत मिळवत गेल्यामुळे या निधीतली रक्कम (खर्ची पडलेली रक्कम वजा जाता) अहवालसाल अखेर रु. १,१६,४७५.७५ होती.

गेल्या ६ वर्षांची **टी.डी.एस. ची एकूण रक्कम रु. १४,४१२** एवढी मोठी आहे. हा **परतावा का घेतला गेला नाही** असे पुण्याचे **श्रीनिवास गोपाळ** (पृ.३८९) यांनी विचारले. याबाबतच्या तांत्रिक **अडचणीचे कोषाध्यक्ष प्रभाकर दामोदर यांनी निवेदन केले** आणि

**योगायोग**

## 'व्हीके' असे सापडले

१९८१ चे दिवाळीचे दिवस. मुंबई कार्पोरेशनच्या बाजूला मराठी पत्रकार संघाचे ऑफिस होते. तिथे दिवाळी अंकाचे प्रदर्शन होते. प्रदर्शनात बरेच नावाजलेले अंक होते. त्यातील काही अंक अगदी लेखकाच्या पत्त्यासहित चाळले त्यातच मला एका लेखाच्या शेवटी 'स्वप्नसाफल्य' वरळी, असे दिसले. तो पत्ता लिहून घेतला व पुढे चि. पुष्कराजच्या मुंजीचे आमंत्रण पाठविले. मुंजीला आवर्जून श्री. वि. के. आले आणि त्यावेळेपासून श्री. सुरेशभाऊ व वि. के. यांची गट्टी जमली.

होय **तेच हे 'व्ही.के.'** - गेली २० वर्षे प्रतिष्ठानच्या विविध जबाबदाऱ्या पार पाडणारे विनायक केशव (पृ.२०).

**- वामन गणेश** (पृ.५०३), जोगेश्वरी, मुंबई

त्या दूर करून शक्य तो लवकर ही रक्कम परत मिळवण्याचे प्रयत्न करण्यात येत असल्याचे सांगितले. कार्यवाह **मोहन सदाशिव** यांनी असे सुचविले की ज्या सहकारी बँकात ठेवीवरील व्याजातून अशी करकपात केली जाते त्या बँकांचे **नाममात्र सभासदत्व स्वीकारून ही करकपात टाळता येईल काय** तेहि पडताळून पहावे.

कै. सुरेशभाऊ स्मृति **सांस्कृतिक कार्यक्रम खर्च रु. ६९५०** बाबत घाटकोपर, मुंबईचे **गजानन भास्कर यांनी तपशील विचारला.** त्यावर कोषाध्यक्षांनी ठाणे येथे झालेल्या कार्यक्रमाचा हा खर्च असल्याचे सांगितले. तसेच यापैकी रु. ५,५०० हा खर्च प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष आनंदराव यांनी केला असून ती रक्कम ताळेबंदामध्ये सुरेशभाऊ स्मृति निधी देणगी म्हणून जमा दाखवली आहे असेहि सांगितले.

या सर्व चर्चेनंतर वार्षिक अहवाल, ताळेबंद आणि नफातोटापत्रक सर्वानुमते मंजूर करण्यात आले. त्यानंतर २००५-०६ या कालावधीसाठी प्रतिष्ठानचे **वैधानिक हिशेबतपासनीस** म्हणून **चंद्रकांत वामन मराठे,** चार्टर्ड अकौंटंट (पृ.१००) यांची रु. ७५० मानधनावर नेमणूक करावी असे सर्वानुमते ठरविण्यात आले.

यानंतर प्रतिष्ठानच्या भावी कार्यक्रमाबाबत चर्चा सुरू झाली. यात प्रामुख्याने **प्रतिष्ठानच्या** स्वत:च्या **वास्तुप्रकल्पाबाबत** चर्चा झाली. सप्टेंबर २००५च्या हितगुजच्या अंकांतील याबाबतचे आवाहन (An Earnest Appeal to Marathe Parivar) आणि त्याच अंकांत प्रतिष्ठानवृत्त मध्ये दिलेल्या ९ जुलै २००५ रोजी पुण्यात झालेल्या कार्यकारी मंडळाच्या सभेतील चर्चेचा वृत्तान्त या अनुषंगाने **कार्योपाध्यक्ष रमाकांत विद्वांस** यांनी सभेला प्रतिष्ठानच्या वास्तुप्रकल्पाबाबत थोडक्यात माहिती दिली. यासाठी मिळणाऱ्या देणग्यांना आयकरात सवलत मिळण्याच्या दृष्टीने घटनेमध्ये शब्दयोजनेत काही किरकोळ बदल का करायला हवे याबाबत सविस्तर माहिती ब्राह्मण सहाय्यक संघाचे मार्गदर्शक **ॲडव्होकेट विजय पटवर्धन** यांनी दिली. **सदानंद मराठे** यांनी विचारले की एवढा मोठा प्रकल्प घेण्याऐवजी तूर्त भाड्याने एखादा फ्लॅट घेऊन काम भागणार नाही का? तर कोफराड आगाशीचे **जनार्दन गोविंद** यांनी युवा पिढीचा, पुढील ३०-४० वर्षांचा विचार करून फ्लॅट न घेता प्लॉट घेऊन इमारत बांधण्याचा विचार करावा असे सुचविले. या संदर्भात सविस्तर चर्चेअंती कार्यकारी मंडळाने प्रस्तावित केलेल्या वास्तुप्रकल्पाला मान्यता देण्यात आली आणि त्यासाठी आवश्यक घटनादुरुस्तीसाठी लवकरात लवकर विशेष सर्वसाधारण सभा बोलावण्यात यावी असे ठरविण्यात आले.

## कुलवृत्तान्त घराणेवार छापावा

आपल्या कुलवृत्तांताला मागणी येऊ लागल्याने कुलवृत्तांताच्या झेरॉक्स प्रती काढावयाच्या हे वाचून पुढील विचार मनात येऊन गेला बघा पटतो का?

संपूर्ण कुलवृत्तांताची झेरॉक्स प्रत काढण्यापेक्षा ज्या कुलबांधवाकडून मागणी येईल त्याची घरण्यापुरती झेरॉक्स प्रत व इतर घराण्यांचे कुलाचार व घराण्यांची विशेष माहिती इतक्याचीच झेरॉक्स काढली म्हणजे खर्चात बचत होईल कारण इतर घराण्यातल्या व्यक्तींच्या जंत्रीत स्वारस्य नसते.

**- महेश अनंत** (पृ.५२८), मुलुंड, मुंबई

यानंतर सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा समाप्त झाल्याचे जाहीर करण्यात आले. सभेनंतर त्याच ठिकाणी परिवारातील गुणवान विद्यार्थ्यांना ज्येष्ठ कुलबांधव जनार्दन गोविंद (पृ.४०५) आणि दत्तात्रय आत्माराम (पृ.३२६) यांच्या हस्ते **गुणवत्ता पारितोषिके** देण्यात आली.

### कुलवृत्तांत

अनेक कुलबांधवांना कुलवृत्तांत हवा आहे. प्रती संपल्यामुळे काही थोड्या प्रती झेरॉक्स करून घेतल्या आहेत. (पाने सुमारे ९००) किंमत रु. ६००. इच्छुकांनी कृपया त्वरित कार्यवाहांशी संपर्क साधावा.

### रद्दी विक्री निधी

याबाबतचे आवाहन सप्टेंबर अंकात केले होते. १००० सभासदांनी वर्तमानपत्रांच्या रद्दी विक्रीची रक्कम प्रतिवर्षी प्रत्येकी रु. १०० प्रतिष्ठानकडे वर्ग केली तरी वर्षात १ लाखाचा निधी जमू शकेल. आपली रक्कम चेक/ड्राफ्टने 'मराठे प्रतिष्ठान, मुंबई' या नावाने त्वरित पाठवावी. आतापर्यंत कुलबांधवांकडून रु. २४०२ जमा झाले आहेत.

### देणग्या

सप्टेंबर ते नोव्हेंबर २००५ या काळात प्रतिष्ठानकडे जमा झालेल्या निधीचा तपशील खालीलप्रमाणे :

**सभासदत्व व हितगुज वर्गणी : (प्रत्येकी रु. ३००)** - रजत प्रभाकर, पुणे, मोहिनी माधव परांजपे, पुणे, अर्चना अभ्यंकर, पिंपरी-पुणे (कालिदास बाळकृष्ण यांची मुलगी) (एकूण ३).

**शिक्षण निधी**

शंकर कृष्णाजी, प्रभादेवी, मुंबई (रु. १००१), मेधा हेमंत परांजपे, विलेपार्ले, मुंबई (रु. १०००), सुनंदा चक्रदेव, जोगेश्वरी, मुंबई (रु. १०००), चिंतामणी महादेव - पितृस्मृती देणगी, परळ, मुंबई (रु. ५०१), गजानन चिंतामणि - पितृस्मृती देणगी, पुणे (रु. १००)

**जाहिरात (हितगुज, सप्टेंबर २००५)**

प्रभाकर दामोदर, वडाळा, मुंबई (रु. ६००), कालिदास बाळकृष्ण, गोवा (रु. ५००), प्रफुल्ल भातखंडे, नालासोपारा (रु. १००).

**पुणे वर्धापनदिन देणगी**

मोहिनी माधव परांजपे, पुणे (रु. २०००).

**रद्दी विक्री निधी**

मोहन सदाशिव, खार, मुंबई (रु. २००१), स्मिता वामन चक्रदेव, अंधेरी, मुंबई (रु. २००), दत्तात्रय आत्माराम, मुलुंड, मुंबई (रु. १०१), लक्ष्मण शंकर, मुलुंड, मुंबई (रु. १०१).

**वास्तुप्रकल्प विनाव्याज ठेव**

रमाकांत माधव विद्वांस, माहीम, मुंबई (रु. २५०००).

**आजीव सदस्य वर्गणी : (प्रत्येकी रु. १००)**

सूर्यकांत वासुदेव, डोंबिवली, दत्तात्रय (राहुल) सूर्यकांत, डोंबिवली.

***

**हितगुज वर्गणीदारांचे पत्ते** (आपापल्या गावातील हितगुज वर्गणीदारांशी संपर्क साधता यावा यासाठी डिसेंबर २००४ पासून क्रमाक्रमाने हितगुज वर्गणीदारांचे पत्ते देण्यात येतात. ठाणे जिल्हा, नवी मुंबई आणि U.S.A मधील वर्गणीदारांचे पत्ते या अंकात दिले आहेत.)

**ठाणे शहर**

२९८२/६४५/६८१बी२/के-१०२
विजय अनंत खांबेटे
दत्त मंदिर, कोळीवाडा, चेंदणी,
**ठाणे (प.)**, ४०० ६०१.

२१२५/८९/६९५जे/के-१०४
मधुसूदन रामकृष्ण खांबेटे
बंगश्री, खांबेटे वाडी, चरई, एदलजी रोड,
**ठाणे (प.)**, ४०० ६०१.

३०१८/७२७/६३३जे/के-०९७
प्रभाकर सदाशिव विद्वांस
ओम सदाशांती सोसायटी, माजिवडे बसस्टॉप जवळ,
माजिवडे, **ठाणे (प.)**, ४०० ६०१.

२०५६/५८६/१२९/के-१८
सुधाकर बळवंत मराठे
मनसुभा, ३रा मजला, राम मंदिर रोड,
घंटाळी मंदिराजवळ, **ठाणे (प.)**, ४०० ६०१.

२६५४/२१५/३०३बीएस/के-०३८
विनय वसंत मराठे
विधाता अपार्टमेंट, कॉलेज रोड,
**ठाणे (प.)**, ४०० ६०१.

२८५३/४९१/०८३डी/के-००९
कृष्णकुमार मधुकर मराठे
वैद्य सदन, राघोबा शंकर रोड, चेंदणी,
**ठाणे (प.)**, ४०० ६०१.

२१५९/९०/६९६बी/के-१०४
सदानंद रामकृष्ण खांबेटे
बंगश्री, २रा मजला, खांबेटे वाडी, चरई,
एदलजी रोड, **ठाणे (प.)**, ४०० ६०१.

२४८८/५३६/३७६एफ/के-०४६
प्रमोद कृष्ण मराठे
बी-१/२, रुणवाल नगर, कोलबाड,
प्रताप टॉकीज जवळ, **ठाणे (प.)**, ४०० ६०१.

६४४/४२८सीएस/के-०५४
सौ. मंजिरी (मृणाल) श्रीराम देव
गुरु छाया, ५०, सुभाष रोड, ब्राह्मणसभेजवळ,
**ठाणे (प.)**, ४०० ६०१.

३२६८/९४०/२७७/के-०३५
अजित वामन मराठे
कैलास, विष्णूनगर, नौपाडा,
**ठाणे (प.)**, ४०० ६०२.

२९८०/६०१/०४७बी४/के-००२
सदानंद धुंडिराज मराठे
८/बी/११ वृंदावन सोसायटी,
**ठाणे (प.)**, ४०० ६०१.

२२६५/२८७/३००ई/के-०३७
रामचंद्र गणेश मराठे
ए/२/६०४ ऋतू पार्क,
वृंदावन सोसायटीजवळ, **ठाणे (प.)**, ४०० ६०१.

३३१९/९९५/२७४एफ/के-३५
उमेश दिगंबर मराठे
बी-३/२०१, अयोध्याकुटीर हौ. सोसा.,
यशस्वी नगर, बाळकुम, **ठाणे** ४०० ६०८.

२५५९/१२०/६८७सी/के-१०३
माधव परशुराम खांबेटे
२३, क्षमा, स्टेट बँक कॉलनी, स्वामी विवेकानंद मार्ग,
नौपाडा, **ठाणे (प.)**, ४०० ६०२.

२०१६/७७/२७७के/के-०३५
आनंद यशवंत मराठे
सुयश, विष्णू नगर, नौपाडा,
**ठाणे (प.)**, ४०० ६०२.

२७०१/२५७/३९७ई/के-०४८
श्रीकांत जगन्नाथ मराठे
४६, नवयुग सोसा., सरस्वती बिल्डींग, विष्णू नगर,
संभाजी रोड, नौपाडा, **ठाणे (प.)**, ४०० ६०२.

२५४२/८७/२८८जे/के-०३५
श्रीनिवास केशव मराठे
९-सी, विश्वजित सोसायटी, पेट्रोल पंपाजवळ,
वीर सावरकर मार्ग, **ठाणे (प.)**, ४०० ६०२.

२५१०/७६/२२३के/के-०३२
अरुण रामचंद्र मराठे
२२/२-बी, सचिन सोसायटी, चेंदणी,
कोपरी, मीठबंदर रोड, **ठाणे (पू.)**, ४०० ६०३.

२५४७/६१०/३५९बी/के-०४६
अनंत विष्णू मराठे
१०६, सोळंकी अपार्टमेंट, लुईस वाडी,
उमेदनगर, **ठाणे (प.)**, ४०० ६०४.

२५८१/८६/२४८डी/के-०३२
चंद्रशेखर चिंतामण मराठे
बी/१, नवसंग्राम अपार्टमेंट, विक्रमनगर,
भुसार आळी, कळवा, **ठाणे (प.)**, ४०० ६०५.

२८३१/४९३/६९९ई/के-१०४
सुधीर सदाशिव खांबेटे
आकांक्षा, विष्णू नगर, नौपाडा,
**ठाणे (प.)**, ४०० ६०२.

८४०/२९२जीएस/के-०३५
सौ. जयश्री एच. बर्वे
निशिगंधा, महर्षी कर्वे रोड, गोदरेज शोरुम जवळ,
नौपाडा, **ठाणे (प.)**, ४०० ६०२.

२२९२/६०/२२७एफ/के-०३२
अभिजित प्रभाकर फडणीस (मराठे)
ई/७, पूर्वा सोसायटी, सरस्वती सोसायटी जवळ,
पाचपाखाडी, **ठाणे (प.)**, ४०० ६०२.

२५१९/२९८/३७०क्यू/के-०४६
शंकर दामोदर मराठे
ए/६, श्री दत्तप्रसाद सोसायटी,
हायवे जवळ, पाचपाखाडी, **ठाणे (प.)**, ४०० ६०२.

२९१६/५८५/३७१बी/के-०४६
जगन्नाथ दामोदर मराठे
१२, लक्ष्मीनारायण अपार्टमेंट, तळमजला,
रेड क्रॉस भवनच्या मागे, **ठाणे (प.)**, ४०० ६०२.

२५७६/६६२/३६९ए/के-०४६
मुकुंद रामचंद्र मराठे
नादब्रह्म, आदर्श निवास को. ऑप. हौ. सोसा.,
कोपरी, स्टेट बँकेच्या वर, **ठाणे (प.)**, ४०० ६०३.

२०८५/१२१/०४६क्यू/के-००२
कमलाकर नरहर मराठे
६०१, प्रिन्स पॅलेस, पाचपाखाडी,
राममोहन धिंग्रा मार्ग, **ठाणे (प.)**, ४०० ६०४.

२६१५/८५/७६२ई/के-११४
सुरेश वामन मराठे
३०२, मानस वास्तू, रंगावली सोसा. समोर, सचिन
इंडस्ट्रीजवळ, कोलबाड, **ठाणे (प.)**, ४०० ६०१.

२९३८/६२१/३५९जी/के-०४६
विवेक प्रभाकर मराठे
११/१२, अमोल, ओसवाल पार्क, पोखरण रोड २,
**ठाणे (प.)**, ४०० ६०७.

२६६८/४४/३६६जीडी१/के-०४६
श्रीमती कुमुदिनी सुदाम डोके
रौनक पार्क, बी-३, पोखरण २,
**ठाणे (प.)**, ४०० ६०७.

६१४/६९६एएस/के-१०४
सौ. वीणा विनोद वझे
३०१, सचिनम, नितिन कास्टींग्ज समोर,
महापालिका मार्ग, **ठाणे (प.)**, ४०० ६०२.

२५८९/३९७/२३५एल/के-०३२
विलास नारायण मराठे
११, नीलकंठ तीर्थ, कर्वे ब्राह्मण सोसायटी जवळ,
हिंदू कॉलनी, **ठाणे (प.)**, ४०० ६०२.

३२८१/९५६/१००डी/के-०११
चंद्रकांत वामन मराठे
आशीर्वाद, संभाजी रोड, विष्णूनगर,
नौपाडा, **ठाणे (प.)**, ४०० ६०२.

१३०७/८८८/२९१डी/के-०३५
राजेंद्र विठ्ठल मराठे
१, सुमेधा, घंटाली सहनिवास,
नौपाडा, **ठाणे (प.)**, ४०० ६०२.

२८२९/४९२/६९२ई/के-१०४
विष्णू त्र्यंबक खांबेटे
भट बिल्डींग, घंटाळी मंदिराजवळ,
नौपाडा, घंटाली रोड, **ठाणे (प.)**, ४०० ६०२.

२६९५/२३४/६९२डी/के-१०४
नितिन यशवंत खांबेटे
अनंतछाया बिल्डींग, महाराष्ट्र बँकेजवळ,
गोखले रोड, नौपाडा, **ठाणे (प.)**, ४०० ६०२.

२५२४/२२०/२७६ए/के-०३५
चिंतामण हरी मराठे
हरीनिकेतन, सहकार कॉलनी, समाधान जवळ,
गोखले रोड, नौपाडा, **ठाणे (प.)**, ४०० ६०२.

२४९८/२१८/४००ई/के-०४८
शरदचंद्र वामन मराठे
३१, गोविंदनिवास, मुळेंचे घर, ब्राह्मण सेवा संघ समोर,
नौपाडा, **ठाणे (प.)**, ४०० ६०२.

५५८/३९७एफडी/के-०४८
सौ. वृंदा सुनील पेंडसे
अंबा निवास, ब्राह्मण सेवा संघासमोर,
नौपाडा, **ठाणे (प.)**, ४०० ६०२.

२१२०/२२१/४४०जे/के-०५७
यशवंत आत्माराम मराठे
आत्माराम सदन, प्रशांत नगर,
नौपाडा, **ठाणे (प.)**, ४०० ६०२.

२१८३/७८/३९८एच/के-१०४
नारायण वामन खांबेटे
६, साधना, रामवाडी, नौपाडा,
**ठाणे (प.)**, ४०० ६०२.

२०६९/८०/६९९सी/के-१०४
विष्णू मोरेश्वर खांबेटे,
संयोग, घंटाली कॉलनी, कल्पना सोसायटी जवळ,
नौपाडा, **ठाणे (प.)**, ४०० ६०२.

३१७५/८५७/६२६एच/के-०९७
नितिन गोविंद विद्वांस
ए-४, सोपान सोसायटी, वीर सावरकर मार्ग,
**ठाणे (प.)**, ४०० ६०२.

३००४/६९६/४००बी/के-०४८
उपेंद्र वामन मराठे
१५, नूतन सोसायटी बिल्डींग १, ३रा मजला,
मल्हार सिनेमाजवळ, नौपाडा, **ठाणे (प.)**, ४०० ६०२.

२२८१/१७१/७२४ई/के-१०९
प्रकाश गणेश चक्रदेव
७, सुयोजित सोसायटी, ४१५, नौपाडा,
नौपाडा, **ठाणे (प.)**, ४०० ६०२.

९८२/३१८बी/के-०
सौ. सुरेखा सतीश डोंगरे
जी-३, नरसिंह को. हौ. सोसायटी, गणेशवाडी,
पाचपाखाडी, **ठाणे (प.)**, ४०० ६०१.

२६५५/२१६/६२५के/के-०९८
धनंजय श्रीराम विद्वांस
श्रीलक्ष्मीनारायण मंदिर, गोखले रोड,
नौपाडा, **ठाणे (प.)**, ४०० ६०२.

२५४८/२१९/१७४जी/के-०२५
सुरेश नारायण मराठे
गांगल वाडा, ब्राह्मण सेवा संघासमोर,
नौपाडा, **ठाणे (प.)**, ४०० ६०२.

२४६८/१७२/७४१डी/के-११०
सदाशिव गोपाळ जोशी
प्रदीप, २रा मजला, नौपाडा पोलिस स्टेशन जवळ,
प्रशांत नगर, नौपाडा, **ठाणे (प.)**, ४०० ६०२.

५४२६९६३/२२६८/३००/७०१सी/के-१०६
विष्णू वासूदेव खांबेटे
६०१, रामतीर्थ, ६वा मजला, राम मारुती रोड,
नौपाडा, **ठाणे (प.)**, ४०० ६०२.

२५३५/२४०/१७५ई/के-०२५
नारायण त्र्यंबक मराठे
५, मदन विलास, रामवाडी,
नौपाडा, **ठाणे (प.)**, ४०० ६०२.

५४४१३६२/६९८/७३०सीडी२/के-१००
श्रीमती नीला सरवटे
सीताविहार, ई विंग, २०१-०२,
दमाणी इस्टेट, ठाणे (प.), ४०० ६०२.

३२६९/९४१/८२/के-९
काशिनाथ विष्णू मराठे
लेक व्ह्यू अपार्ट., ७६, ६वा मजला, एच-१, श्रीरंग सो.,
माजिवडे, **ठाणे (प.)**, ४०० ६०१.

२५७३/१२२/७५५जी/के-११३
नारायण जनार्दन जाईल
१२, साधना सदन, हायवे सो., स्वा. विवेकानंद रोड,
टेलि. एक्स्चेंज मागे, नौपाडा, **ठाणे (प.)**, ४०० ६०२.

## डोंबिवली शहर

३२७०/९४४/६३सी/के-००५
श्री. चिंतामण शंकर मराठे
१९, अमी को. हौ. सो., ३रा मजला, ठाकूर वाडी,
**डोंबिवली (प.)**, जि. ठाणे ४२१ २०२.

८३८/२९२जीएस/के-०३५
श्रीमती आशा डी. गद्रे
स्नेहबंधन सोसायटी, एन. सी. केळकर पथ,
**डोंबिवली (प.)**, जि. ठाणे ४२१ २०२.

३११२/८००/पी-?/के-०००
गुणाकर महादेव मराठे
१६/३, बुधाजी टॉवर, पं. दीनदयाळ मार्ग,
**डोंबिवली (प.)**, जि. ठाणे ४२१ २०२.

२१६०/१५५/६२५सी/के-०९७
यशवंत (सुरेश) बाळकृष्ण विद्वांस
बी-००३, शुभवास्तु अपार्टमेंट, दीनदयाळ रोड,
विष्णूनगर, **डोंबिवली (प.)**, जि. ठाणे ४२१ २०२.

३१११/१५६/१८७एन/के-००९
सुरेश गोविंद मराठे
ए/७, गणेशदीप सोसायटी, दीनदयाळ रोड,
**डोंबिवली (प.)**, जि. ठाणे ४२१ २०२.

२२५०/९९१०/७२९सी/के-१०९
मधुकर रामचंद्र चक्रदेव
३/१६, परिमल सोसायटी, दीनदयाळ रोड,
विष्णूनगर, **डोंबिवली (प.)**, जि. ठाणे ४२१ २०२.

२५८५/१६९/८६५एफ/के-१०४
विवेक विनायक खांबेटे
बी९, गणेशस्मृति, २रा मजला, गणेश मंदिर रोड,
**डोंबिवली (प.)**, जि. ठाणे ४२१ २०२.

२३४१/४२/३०२सी/के-०३८
उदय जनार्दन मराठे
ए १०२, बि. नं. २, आदर्श पार, खंबालपाडा रोड,
**डोंबिवली (प.)**, जि. ठाणे ४२१ २०२.

२७०८/२८०/६४५ए/के-०९८
अशोक नारायण विद्वांस
डी १६, महाजन सो., माधवाश्रम हॉल जवळ,
मानपाडा रोड, **डोंबिवली (पू.)**, जि. ठाणे ४२१ २०१.

३०३३/७१६/३१६एम/के-०४१
माधव मधुकर मराठे
बी/३२, बसवेश्वर सोसायटी, सारस्वत कॉलनी,
ठाकुर्ली, **डोंबिवली (पू.)**, जि. ठाणे ४२१ २०१.

४००१/११८/०६२बी/के-००५
अरविंद गणेश मराठे
२, स्वामी समर्थ सोसायटी, गोपाळनगर रोड नं. १,
**डोंबिवली (पू.)**, जि. ठाणे ४२१ २०१.

१००५/४३/३२९के/के-०४१
माधव नारायण मराठे
३५ डी, अलंकार सोसायटी, टिळक पथ,
**डोंबिवली (पू.)**, जि. ठाणे ४२१ २०१.

२९६५/६८०/६२२जी/के-०९७
यशवंत कृष्णाजी विद्वांस
बी ११, मंगेश सोसायटी, ठाकुर्ली,
**डोंबिवली (पू.)**, जि. ठाणे ४२१ २०१.

२३५६/४१४/३४२जी/के-०४३
श्रीनिवास अच्युत मराठे
९, ओमभुवन, २ वॉटर टँक जवळ, म. फुले रोड,
विष्णूनगर, **डोंबिवली (प.)**, जि. ठाणे ४२१ २०२.

२९७३/६६३/०८७सी/के-००९
श्रीपाद यशवंत मराठे
श्रीचंद्रमणि को. हौ. सो. लि., म. फुले रोड,
**डोंबिवली (प.)**, जि. ठाणे ४२१ २०२.

९८७/४९७/के-०६७
श्री. सुनील जनार्दन मराठे,
बी-१८, रामेश्वर दर्शन, पेंडसे नगर, रोड नं. १,
**डोंबिवली (पू.)**, ४२१ २०१.

९९५३/९९९ए/के-९९९
डॉ. राम बिवलकर
०३, श्रीराम प्लाझा, आरएच ५४, एम.आय.डी.सी.
कॉलनी, **डोंबिवली (पू.)**, जि. ठाणे ४२१ २०१.

८३७/२९२जीएस/के-०३५
श्रीमती इंदिराबाई एस. गोगटे
भागिरथी निवास, एस. व्ही. जोशी हायस्कूल जवळ,
गोगटे बंगला, **डोंबिवली (पू.)**, जि. ठाणे ४२१ २०१.

३००५/६९७/४७२बी/के-०६२
मनोज मधुसूदन मराठे
वैभव, गजबंधन सो., गडकरी पथ, सी.के.पी. हॉल
समोर, **डोंबिवली (पू.)**, जि. ठाणे ४२१ २०१.

२७५२/३५०/०९२एफ/के-००८
गणेश त्र्यंबक मराठे
४०४, शिव आशीर्वाद अपार्टमेंट, गणेश मंदिर रोड,
नेहरु मैदान, **डोंबिवली (पू.)**, जि. ठाणे ४२१ २०१.

२७०६/२७३/३०७ए/के-०४१
विनायक विष्णू मराठे
६/७, श्री कुटीर, १ला मजला, मानपाडा क्रॉस रोड,
अयोध्यानगरी, **डोंबिवली (पू.)**, जि. ठाणे ४२१ २०१.

२५०१/३०५/३२९के/के-०४८
माधव (अनिल) यशवंत मराठे
डी ३, महाजन सोसायटी, माधवाश्रम हॉल जवळ,
मानपाडा रोड, **डोंबिवली (पू.)**, जि. ठाणे ४२१ २०१.

२५९९/४९/३६५बी/के-०४६
मुकुंद सदाशिव मराठे
२०५, रुद्राक्ष सोसायटी, सावरकर पथ,
**डोंबिवली (पू.)**, जि. ठाणे ४२१ २०१.

३०९०/७८७/११४बी/के-०१५
रामकृष्ण भास्कर मराठे
वीरकर कंपाऊंड, टिळक नगर, डॉ. राजेंद्रप्रसाद रोड,
**डोंबिवली (पू.)**, जि. ठाणे ४२१ २०१.

२३६१/२७०/१७३के/के-०२५
अरुण विश्वनाथ मराठे
जोशीवाडी, मानसरोवर, टाटा पॉवर लाईन रोड,
**डोंबिवली (पू.)**, जि. ठाणे ४२१ २०१.

२८७२/५४४/११७ए/के-०१५
मनोज गोविंद मराठे
ए/२०१, मंगलमूर्ती, मानपाडा रोड, पांडुरंग वाडी,
**डोंबिवली (पू.)**, जि. ठाणे ४२१ २०१.

२१०९/७१/३२१ए/के-०४१
अशोक यशवंत मराठे
१३/२, हरीप्रिया सोसायटी, संत नामदेव पथ,
**डोंबिवली (पू.)**, जि. ठाणे ४२१ २०१.

५००६/१७०/२९२के/के-०३५
महेश्वर दामोदर मराठे
सी/४, अंबिका पॅलेस, रामनगर, चित्तरंजन दास रोड,
**डोंबिवली (पू.)**, जि. ठाणे ४२१ २०१.

२०९६/३०३/६०७डी/के-०९६
अशोक लक्ष्मण मराठे
४ शैलेंद्र अपार्टमेंट, रामनगर, चित्तरंजन दास रोड,
**डोंबिवली (पू.)**, जि. ठाणे ४२१ २०१.

२३६६/२५२/६४४डी/के-०९८
मनोहर गणेश विद्वांस
१०४, ओम गांवदेवी आशीर्वाद, केळकर रोड,
रामनगर, **डोंबिवली (पू.)**, जि. ठाणे ४२१ २०१.

२३४५/२८४/१९८जी/के-०३०
वसंत विनायक मराठे
गुरुप्रेम, ११३/१ सावरकर मार्ग,
**डोंबिवली (पू.)**, जि. ठाणे ४२१ २०१.

२३४८/२८५/६७५ए/के-१०१
गिरीश वसंत खांबेटे
ईशभुवन सोसायटी, रामनगर, शिवमंदिर रोड,
**डोंबिवली (पू.)**, जि. ठाणे ४२१ २०१.

२३५४/३०४/२९२जे/के-०३५
मुरलीधर दामोदर मराठे
सी-५, विश्वनाथ दर्शन, एस. के. पाटील शाळेसमोर,
रामनगर, **डोंबिवली (पू.)**, जि. ठाणे ४२१ २०१.

२०७८/२८६/१३८डी/के-०२१
शरद कृष्णाजी मराठे
१०२, भागवती कृपा नं. २, राजाजी पथ,
**डोंबिवली (पू.)**, जि. ठाणे ४२१ २०१.

२३४७/२७७/३३६सी/के-०४२
अरुण श्रीधर मराठे
अभ्युदय/बी, रायकर बिल्डींग, राजेंद्रप्रसाद रोड,
दत्तनगर, **डोंबिवली (पू.)**, जि. ठाणे ४२१ २०१.

२३९१/४८/२९२जी/के-०३५
अरविंद (मनोहर) दामोदर मराठे
सदय, प्लॉट आरएल/८२, एम.आय.डी.सी. रेसिडन्स झोन,
मिलापनगर, **डोंबिवली (पू.)**, जि. ठाणे ४२१ २०३.

२३१९/४७५/३५८डी/के-०४६
श्रीकृष्ण रामचंद्र मराठे
आर ई २६, शर्वरी, एम.आय.डी.सी. रेसि. एरिया,
डोंबिवली जिमखाना, **डोंबिवली (पू.)**, जि. ठाणे ४२१ २०३.

९८१
माधव वामन मराठे
जयभवानी नं. ५, २रा मजला, राजेंद्रप्रसाद रोड,
दत्तनगर, **डोंबिवली (पू.)**, जि. ठाणे ४२१ २०१.

२९३६/६१५/३५९डी/के-०४६
यशवंत (हेमंत) विष्णू मराठे
बी/२०१, सिद्धिविनायक निवास, ब्राह्मण सभेच्या समोर,
मुखरजी रोड, **डोंबिवली (पू.)**, जि. ठाणे ४२१ २०१.

३१०७/७८५/५९१के/के-०८२
विष्णूमूर्ती सुबराय मराठे
१५, गौरीशंकर सोसायटी, पेंडसे नगर रोड नं. १,
**डोंबिवली (पू.)**, जि. ठाणे ४२१ २०१.

२३२२/३०६/१२८के/के-०१८
दत्तात्रय लक्ष्मण मराठे
दामले बिल्डींग, सी विंग, २रा मजला, फडके रोड,
**डोंबिवली (पू.)**, जि. ठाणे ४२१ २०१.

२३६०/४६/०५४सी/के-००३
अरुण चिंतामण मराठे
१३, परदेशी मॅन्शन, रामनगर, चिपळूणकर पथ,
**डोंबिवली (पू.)**, जि. ठाणे ४२१ २०१.

२४३४/७८३/६४९पी/के-०९८
वसंत नारायण विद्वांस, द्वारा पु. वा. गद्रे,
२०२, वासुदेव लक्ष्मी सोसायटी, रामनगर,
केळकर रोड, **डोंबिवली (पू.)**, जि. ठाणे ४२१ २०१.

२३६७/६८८/६४४के/के-०९८
अनंत गणेश विद्वांस
१०१, ओम गांवदेवी आशीर्वाद, केळकर रोड,
रामनगर, **डोंबिवली (पू.)**, जि. ठाणे ४२१ २०१.

विजय यशवंत मराठे
सी-२०१, सुंदरा कॉम्प्लेक्स,
तुकाराम नगर,
**डोंबिवली (पू.)**, जि. ठाणे ४२१ २०१.

२३६५/२८३/११६डी/के-०१५
गजानन रावजी मराठे
२०१, श्री सुयश, रामनगर, उरसेकर वाडी,
**डोंबिवली (पू.)**, जि. ठाणे ४२१ २०१.

२७०४/२७१/२५५एल/के-०३४
प्रभाकर शामराव मराठे
ए/९, ओम दुर्गा सोसा., १ला मजला, राजाजी पथ,
**डोंबिवली (पू.)**, जि. ठाणे ४२१ २०१.

२४३६/४७/३६७पी/के-०४६
मधुकर रामचंद्र मराठे
शिवम कॉम्प्लेक्स सो., बि. नं. ४/बी/२८, राजाजी पथ,
३री क्रॉस लेन, **डोंबिवली (पू.)**, जि. ठाणे ४२१ २०१.

३०३२/७१२/३१६एल/के-०४१
गोविंद मधुकर मराठे
१०२, पुरुषोत्तम सोसा., टाटा पॉवर लाईन,
मानपाडा रोड, **डोंबिवली (पू.)**, जि. ठाणे ४२१ २०१.

### साहित्यासाठी आवाहन

अपत्यप्राप्ती, जन्म-मृत्यु, परीक्षेतील यश, विवाह, पदोन्नती, परदेशगमन इ. आपल्या कुटुंबातील महत्त्वाच्या घटनांची माहिती सभासद वृत्तमध्ये प्रसिद्धीसाठी पाठवावी. तसेच आपले स्वत:चे लेखनही पाठवावे. - **संपादक**

## कल्याण, अंबरनाथ, कुळगांव, टिटवाळा, भिवंडी

३१८६/८७१/६०१डी/के-०९०
सुमेध गजानन मराठे
गजानन महाराज मंदिरासमोर, पारनाका,
**कल्याण,** जि. ठाणे - ४२१ ३०१.

८६९/०२२सीडी/के-००१
सौ. सुचिता सुहास पळनिटकर
१, अनंत अपार्टमेंट, हवेली मंदिर जवळ,
टिळक चौक, **कल्याण,** जि. ठाणे - ४२१ ३०१.

३१०४/७८०/७३५बी/के-१०९
मोरेश्वर परशुराम चक्रदेव
अे-१०२, निवारा कॉम्प्लेक्स, टिळक चौक,
मोडक गल्ली, **कल्याण,** जि. ठाणे - ४२१ ३०१.

२१९०/५०/३४०के/के-०४३
विजय विश्वनाथ मराठे
२०१, सुजाता अपार्टमेंटस्, घोडेखोत आळी,
टिळक चौक, **कल्याण,** जि. ठाणे - ४२१ ३०१.

२९६२/६६६/७३५जी/के-१०९
भगवान दत्तात्रय चक्रदेव
२०२, मयूरदीप अपार्टमेंटस्, अश्विनी हॉस्पिटलजवळ,
वडवली सेक्शन, **अंबरनाथ,** जि. ठाणे - ४२१ ५०१.

३१०५/७८१/३२४एफ/के-०४१
विश्वनाथ विनायक मराठे
ए/३, शिवछाया बिल्डींग, कर्णिक रोड,
**कल्याण,** जि. ठाणे - ४२१ ३०१.

२०८४६४/१२०३/९९०४/०१८सी/के-००१
नारायण परशुराम मराठे
मराठे वाडा, राममारुती चौक, सिद्धेश्वर आळी,
**कल्याण,** जि. ठाणे - ४२१ ३०१.

२९००/५५०/३१६डी१/के-०४१
सौ. उज्ज्वला मुकुंद बापट
७, प्रेरणा अपार्टमेंट, गुर्जर वाडा, टिळक चौक,
मोडक गल्ली, **कल्याण,** जि. ठाणे - ४२१ ३०१.

२८८९/५६५/६३७सी/के-०९८
मधुसुदन यज्ञेश्व विद्वांस
सदाशिव को. हौ. सो., लक्ष्मीनारायण मंदिराजवळ,
टिळक चौक, **कल्याण,** जि. ठाणे - ४२१ ३०१.

२८७६/५१२/७०५के/के-१०७
शरद वामन खांबेटे
डी-९/००१ अन्नपूर्णा नगर, आधारवाडी,
**कल्याण (प.).**

८३९/२९२जीएस/के-०३५
सौ. प्रभावती पी. घुले
शांती-निकेतन, प्लॉट नं. ५७३, खेर सेक्शन,
**अंबरनाथ,** जि. ठाणे - ४२१ ५०१.

३१९४/८८०/२७५एल/के-०३५
मनोहर दामोदर मराठे
प्लॉट नं. १८९, स्मृति, कानसई सेक्शन,
**अंबरनाथ,** जि. ठाणे - ४२१ ५०१.

२२२७/६७४/३९१डी/के-०४७
सुधाकर भगवंत मराठे
स्वानंद, ७३, विवेकानंद सोसायटी, वडवली विभाग,
**अंबरनाथ,** जि. ठाणे - ४२१ ५०१.

२६४५/१५४/७३९झेड/के-१०९
संजीव वामन चक्रदेव
आदित्य, श्री मयुरेश्वर सोसायटी,
**कुळगांव,** जि. ठाणे ४२१ ५०३. (बदलापूर)

२४४२/२४१/४३९एफ/के-०५७
श्रीकांत दिनकर मराठे
श्रीमान बिल्डींग, कत्राप रोड,
**कुळगांव,** जि. ठाणे ४२१ ५०३. (बदलापूर)

२७१६/३०९/३३५सी/के-०४२
वसंत विश्वनाथ मराठे
ऋतुराज अपार्टमेंट, २रा मजला, काटदरे हॉलजवळ,
**कुळगांव,** जि. ठाणे, ४२१ ५०३. (बदलापूर)

३१७४/८५६/५२०एलडी२/के-०७०
श्रीमती श्रुती संजय करमरकर
''श्री'' प्लॉट २२, सर्व्हे १३(६), कीर्ती पोलिस रोड,
शिरगाव, **कुळगांव,** जि. ठाणे ४२१ ५०३. (बदलापूर)

३४३३०५८/२४८०/६४/५५७सी/के-०७३
अनिल गणेश मराठे
१०५, गंगा विहार, पाटील पाडा,
**कुळगांव,** जि. ठाणे, ४२१ ५०३. (बदलापूर)

३१७४/८५६/५२०एलडी२/के-०७०
माधव अनंत मराठे, ९६, हेमकुंज, ·
हेतल अपार्टमेंट समोर, एम.आय.डी.सी. रोड, कात्रप,
**कुळगांव,** जि. ठाणे ४२१ ५०३. (बदलापूर)

८६२/१५६एफ/के-०२३
अनिल पुरुषोत्तम मराठे, मातृछाया, प्लॉट नं. १७,
हायवे, कोकण गृह निर्माण सोसायटी जवळ,
**कुळगांव,** जि. ठाणे ४२१ ५०३. (बदलापूर)

२९३३/६८१/६८३एम/के-१०२
श्रीरंग (नितीन) बळवंत खांबेटे
परिक्रमा, प्लॉट १०, सुमुख सोसायटी,
मांडा, **टिटवाळा,** जि. ठाणे - ४२१ ६०५.

२८८८/५६४/२९८बी/के-०३६
गोविंद (शरद) गंगाधर मराठे
१२४, ब्राह्मण आळी, जोगळेकर वाडा,
टिळक मंदिराजवळ, **भिवंडी,** जि. ठाणे - ४२१ ३०२.

## भाईंदर, वसई, विरार, आगाशी, नालासोपारा

२८३८/५०६/०९२जे/के-००९
अभिजित दत्तात्रय मराठे, प्लॉट नं. २७,
भाईंदर को. ऑप. सोसायटी, हमारा बाजार मागे,
**भाईंदर (प.),** जि. ठाणे ४०१ १०१.

२८३६/५०४/०९२एचडब्ल्यू/के-००९
सौ. मंगला दत्तात्रय मराठे, प्लॉट नं. २७,
भाईंदर को. ऑप. सोसायटी, हमारा बाजार मागे,
**भाईंदर (प.),** जि. ठाणे ४०१ १०१.

२८४२/५१०/०९२०९२एनडब्ल्यू/के-००९
सौ. राजश्री रमेश मराठे
गोखले वाडा, जुन्या मराठी शाळेसमोर,
राम मंदिर रोड, **भाईंदर (प.),** जि. ठाणे ४०१ १०१.

२८३९/५०७/०९२के/के-००९
अनिरुद्ध दत्तात्रय मराठे, प्लॉट न२७,
भायंदर को. सोसायटी, हमारा बाजार मागे,
**भाईंदर (प.),** जि. ठाणे ४०१ १०१.

२८३७/५०५/०९२एच/के-००९
दत्तात्रय त्र्यंबक मराठे, प्लॉट न२७,
भायंदर को. सोसायटी, हमारा बाजार मागे,
**भाईंदर (प.),** जि. ठाणे ४०१ १०१.

२८६४/५३५/१९०बी/के-०२८
अरुण मोरेश्वर मराठे
आर्किटेक्ट, बाबूराव मराठे निवास,
पारनाका, **वसई,** जि. ठाणे ४०१ २०१.

२७८९/४०४/०३०एम/के-००१
विश्वनाथ बळवंत मराठे
ए-७, सिद्धिविनायक, सिद्धिविनायक मंदिरासमोर,
चोरघे नगर, **विरार (पू.),** जि. ठाणे ४०१ ३०३

२३१६/९९३/६४९ए/के-९८
अविनाश दिवाकर विद्वांस
ए-२०३, नरसिंह स्मृति, गोवठणे,
**विरार (प.),** जि. ठाणे ४०१ ३०३.

३०३०/७०८/०४०सी/के-००२
विजय सीताराम मराठे
ए/२०१, चिंतामणी सोसायटी, फाटक रोड,
**भाईंदर (प.),** जि. ठाणे ४०१ १०१.

२८४१/५०९/०९२एल/के-००९
सुधाकर त्र्यंबक मराठे
गोखले वाडा, इस्कॉन मंदिरासमोर, स्टेशन रोड,
**भाईंदर (प.),** जि. ठाणे ४०१ १०१.

२१९२/४४६/१९०ए/के-०२८
अविनाश मोरेश्वर मराठे
आर्किटेक्ट, बाबूराव मराठे निवास,
पारनाका, **वसई,** जि. ठाणे ४०१ २०१.

३२५०/९२७/४६९/के-०६
सतीश आत्माराम मराठे,
जी-४, सुमन को. हौ. सोसा., देसाई हॉस्पिटल जवळ,
**विरार (प.)**, जि. ठाणे ४०१ ३०३.

२१३६/३६६/०१९एन/के-००१
माधव रामकृष्ण मराठे
ए/१२, जे. पी. नगर, ब्लॉक ३३, कोफ्राड व्हिलेज,
**आगाशी-कोफ्राड**, जि. ठाणे ४०१ ३०१.

३१९६/८८२/६४८जी/के-०९८
सुरेश श्रीधर विद्वांस, ए-१२/३५ जे. पी. नगर,
कोफ्राड विलेज, पो. ता. आगाशी,
**आगाशी-कोफ्राड**, जि. ठाणे ४०१ ३०१.

३१०३/७७९/३२७डी/के-०४१
गोविंद (अरुण) पुरुषोत्तम मराठे
सी-१०१, किशोर कुंज, आगाशी पोष्टाच्या वर,
चाळपेठ रोड, **विरार (प.)**, जि. ठाणे ४०१ ३०१.

३११७/८०१/०२१ए१/के-००१
शरद अरुण मराठे
बी-२०४, सारंग अपार्टमेंट, वर्धमान पार्क,
तुळींज, **नालासोपारा (पू.)**, जि. ठाणे ४०१ २०९.

३०३१/७०९/०४०ई/के-००२
जयवंत सीताराम मराठे
सी-२०३, राजहंस सोसायटी, तुळींज रोड, ता. वसई,
**नालासोपारा (पू.)**, जि. ठाणे ४०१ २०९.

३०२९/७४६/०२१ए३/के-००१
हेमंत अरुण मराठे,
डी-२०१, शिव-गंगा कॉम्प्लेक्स, वर्तक टॉवर समोर,
तुळींज, **नालासोपारा (पू.)**, जि. ठाणे ४०१ २०९.

३२७९/९९९/३२एएस/के-००१
रविंद्र दिनकर मराठे
सत्यम, १ला मजला, स्टेट बँकेसमोर,
**विरार (प.)**, जि. ठाणे ४०१ ३०३.

२८४८/५१३/३१७एम/के-०४१
विजय चिंतामण मराठे
१६/४४९, जे. पी. नगर, कोफ्राड व्हिलेज,
**आगाशी-कोफ्राड**, जि. ठाणे ४०१ ३०१.

२३१६/५१४/६४८के/के-०९८
दिवाकर गोविंद विद्वांस
ॲडव्होकेट, मुस्लिम आळी, आगाशी,
**विरार (प.)**, जि. ठाणे ४०१ ३०१.

२२६९/२५९/४०५एफ/के-०४९
जनार्दन गोविंद मराठे
३०४, रिद्धि सिद्धि अपार्टमेंट, प्राथमिक आरोग्य
केंद्राजवळ, आगाशी, **विरार (प.)** ४०१ ३०१.

३२००/८८६/०८८एच/के-००९
प्रसाद पांडुरंग मराठे
१४-बी, विशाल अपार्टमेंट, भाटी बंदर रोड, आगाशी,
शंकर मंदिरासमोर, **विरार (प.)**, जि. ठाणे ४०१ ३०१.

३१९८/८८४/०९१ए/के-००९
पद्माकर विनायक मराठे
सी-१०२, विशाल अपार्टमेंट, टंकी रोड,
तुळींज, **नालासोपारा (पू.)**, जि. ठाणे ४०१ २०९.

२१४६/९०५/५०३डी/के-०६८
शिवराम गणेश मराठे
संतोष भुवन,
**नालासोपारा (पू.)**, जि. ठाणे ४०१ २०९.

३२०१/८८७/७०४एच/के-१०७
पुरुषोत्तम रामचंद्र खांबेटे
सी/१०१, दामोदरनगर को. ऑप. हौ. सोसा.,
तुळींज रोड, **नालासोपारा (पू.)**, जि. ठाणे ४०१ २०९.

३२२०/९९२/१५०जे/के-०२३
अशोक परशुराम मराठे
२०३, अंजनीसुत नं. १, सालसर पार्क,
तुळींज, **नालासोपारा (पू.)**, जि. ठाणे ४०१ २०९.

३३१६/९९३/६४९ए/के-०९८
अविनाश दिवाकर विद्वांस
ए/२०३, नरसिंह स्मृती, गावठाण,
**विरार (प.)**, जि. ठाणे ४०१ ३०३.

## नवी मुंबई

७५७२७३०/२८०७/४३४/के-०३७
विनायक शंकर मराठे
सेक्टर १ए, सी-५-६-१:४, बेलापूर,
**सी. बी. डी, नवी मुंबई** - ४०० ६१४.

५००१/२२/२४२एफ/के-०३२
वसंत रामचंद्र मराठे
जे.एन. ४, १३/६, सेक्टर ९, वाशी,
सेक्टर ९, **नवी मुंबई** - ४०० ७०३.

७५७०५९१/२८५/५२९/६५८आर/के-०९९
हरी दत्तात्रय विद्वांस
सेक्टर १ए, सी-५-९-१:३, बेलापूर,
सी. बी. डी, **नवी मुंबइ** - ४०० ६१४.

३२२८/९११/४०६/के-०४९
मुकुंद नारायण मराठे
१२८१, प्लॉट नं. २८ अ व ब, सेक्टर २४,
तुर्भे, गांवठाण, नवी मुंबई - ४०० ७०५.

## U.S.A.

1205/72/389D/K-047
Dr. Eknath Vyanktesh Marathe
25, King's Grant Road, St. Catharines,
Ontario, L2N 2SI, Canada

1303/524/070D/K-006
Mr. Ajay Madhusudan Marathe
20876 Beauchams Ln. Saratoga
CA 95070 USA

408-865-0220/1210/522/069C/K-006
Mr. Madhav Vinayak Marathe
18477, Edminton Dr.
Cupertino, CA 95014-6409 USA

408-937-0230/1002/9902/069BW/K-006
Mrs. Malati Vinayak Marathe
2760, McKee Road # 210, San Jose,
CA 95127 USA

1211/523/719A/K-109
Mr. Ajit Ashok Chakradev
312, York Court, Walnut Creek,
CA 94598 USA

1214/9908/132K/K-019
Mr. Arvind Shankar Marathe
4600, N Camino De Oeste, Tucson,
AZ 85745 USA

408-255-9485/5007/149/070A/K-006
Mr. Mukund Vinayak Marathe
11762, Pine Brook Lane, Cupertino,
CA 95014 USA

408-937-0230/1003/3/069B/K-006
Mr. Vinayak Gopal Marathe
2760, McKee Road # 210, San Jose,
CA 95127 USA

1304/525/426E/K-054
Mr. Avinash Janardan Marathe
950, Capitota Way, Santa Clara,
CA 95051 USA

योगायोग

## आयत्यावेळचा अध्यक्ष

गोमंतकात पहिल्या संमेलनाला अध्यक्ष म्हणून तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांना बोलाविले होते. त्यांचे सेक्रेटरी श्री. कोल्हटकर यांनी शास्त्रीजी येतील म्हणून पत्रही पाठविले होते. पण... पण संमेलनाच्या आदल्याच दिवशी शास्त्रीजी आजारी पडून हॉस्पिटलमध्ये दाखल झाले.

आता आली का पंचाईत? पण मी व श्री. कालिदास दोघांनीही अगदी संमेलन दिवसापर्यंत काहीही वाच्यता केली नाही.

मात्र तो दिवस मी पूर्णपणे विचार करून रात्री मनाशी पक्की खूणगाठ बांधली की संमेलनाध्यक्ष म्हणून श्री. मधुकर विष्णू मराठे, कराड यांनाच नेमावयाचे व अशा तऱ्हेने चांगला अध्यक्ष आम्हाला लाभला. पुढे ते व मी पायी दौरा करून, वेळप्रसंगी जेवणाऐवजी भेळ खाऊनही, कुलवृत्तांताचा दौरा करून उन्हातान्हात फिरून एकेक मराठे टिपले.

विशेष योगायोग म्हणजे अलिकडेच कै. मधुकर मराठे यांचे चिरंजीव डॉ. सतीश मराठे यांनी श्री. श्रीधर मराठे यांच्या सौं.ना हॉस्पिटलमध्ये बहुमोल मदत केली.

ह्याचाच अर्थ पंचवीस वर्षांपूर्वीची प्रतिष्ठानची मुळे जनमानसात घट्ट झाली असेच नाही का?

**- वामन गणेश** (पृ.५०३), जोगेश्वरी, मुंबई

# होय, मला लग्न करायचंय

**सुनील सदानंद विद्वांस** (पृ.६५०), मुद्देबुद्रुक, कर्जत, जि. रायगड

आपले बालपण व त्यानंतरची कुमारावस्था संपून मानवाने तारुण्यात प्रवेश केल्यावर तो अनुभवाने, विचाराने थोडाफार प्रगल्भ होतो. आपले शालेय शिक्षण, कॉलेज शिक्षण घेताना आपल्या समवयस्क मित्र-मैत्रिणींबरोबर त्याचा जवळचा संबंध येतो आणि एका विशिष्ट वळणावर आल्यानंतर त्याला/तिला लग्न या शब्दाबद्दल मनात उत्सुकता निर्माण होते.

माझ्या मते लग्नाच्या वेळी मुलाचे वय २२ ते २५ या दरम्यान असावे आणि मुलीचे वय २० वर्षापर्यंत असावे. आजकाल सामाजिक परिस्थिती एवढी प्रचंड प्रमाणात बदलली आहे की केवळ नोकरी नाही म्हणून लग्न करता येत नाही असे हजारो तरुण लग्नाच्या प्रतीक्षेत आहेत. आपली भारतीय संस्कृती समाजातून अद्याप संपूर्ण लोप पावलेली नाही त्यामुळे आपले आई-वडील, आपले आप्त यांच्याबद्दल आपुलकी असणारे अनेक तरुण/तरुणी समाजात आहेत. त्यांना आपले लग्न झाल्यानंतर सुद्धा एकत्र राहाण्याची इच्छा असते पण मुख्य अडचण असते ती जागेची, जागा मोठी असली तर नोकरीचे ठिकाण लांब असते. परंतु ज्यांची आर्थिक परिस्थिती चांगली असेल त्यांनी एकत्रच राहाण्याचा प्रयत्न करावा. एकत्र राहताना काही गोष्टीत मनाला मुरड घालावी लागते ती घालावी.

आजकाल पैसा हेच सर्वस्व अशी समाजात धारणा झाल्यामुळे अध्यात्मिक संस्कृती जवळ जवळ बऱ्याच ठिकाणी लोप पावत चालली आहे त्यामुळे अशी माणसे आत्मकेंद्रित बनत चालली आहेत. केवळ मी, माझे आणि मला ही वृत्ती फोफावत चालली आहे. पण एकत्र कुटुंबात राहिल्यामुळे माझे हितच आहे, माझी मुले यातूनच संस्कार उचलणार आहेत. मी व माझे कुटुंब सुरक्षित राहू शकतो. प्रसंगी माझे आई-वडीलच माझी विचारपूस करतील याकडे अशी व्यक्ती दुर्लक्ष करते. मागून पश्चात्तापाची पाळी येते.

भरपूर पैसा कमविणे हा काही गुन्हा होऊ शकत नाही. तरी पण मानवाच्या सुखाच्या कल्पनाच आजकाल बदलून गेल्या आहेत. आर्थिक बाबतीत एकमेकांवर कुरघोडी करण्याचा प्रत्येकाचा सतत प्रयत्न चाललेला आहे. त्यामुळे अनीतीने का होईना माझ्याजवळ भरपूर पैसा असला पाहिजे अशी मानसिक व विपरीत अवस्था निर्माण झाली आहे. मुलाबाळांकडे व्यवस्थित स्वत: लक्ष देऊन, पति किंवा पत्नीची जर कोणतीही कुचंबणा होत नसेल तर दोघांनी कमवायला हरकत नसावी.

> **हसरे हितगुज**
>
> **'नर्सेस' चे पेंटिंग?**
>
> मुंबई महापालिकेत मराठी विभाग ४० वर्षापूर्वी स्थापन करण्यात आला. त्यापूर्वीची गोष्ट. एकदा 'टेंडर्स आर इन्व्हायटेड फॉर पेंटिंग नर्सेस क्वार्टर्स'. याचे 'परिचारिकांचा एक चतुर्थांश भाग रंगविण्यासाठी निविदा मागविल्या आहेत,' असे मराठी भाषांतर पालिकेच्या स्थापत्य विभागाने करून ते मराठी वृत्तपत्रात प्रसिद्ध केले.
>
> त्यावेळी कै. अप्पा पेंडसे हे हुशार व मिश्किल नगरसेवक होते. 'परिचारिकांच्या रंगरंगोटीची व्यवस्था महापालिका केव्हापासून पाहू लागली', असा गंमतीशीर मुद्दा त्यांनी मांडला असता आयुक्तांनी त्यावर खुलासा करून माफी मागितली. त्यावर महापौर गमतीने म्हणाले, बहुधा क्वार्टर घेऊन भाषांतर केले असावे. या वाक्याने सभागृहात हंशा पिकला.
>
> - **गजानन भास्कर** (पृ.४२७), घाटकोपर, मुंबई

पैशांच्या हव्यासापोटी पति-पत्नी दोघेही नोकरी करत असले तर ज्यावेळेस अशी व्यक्ती दमून-भागून घरी येते त्यावेळेस आपल्या स्वभावाप्रमाणे मुले साहजिकच त्यांच्याजवळ हट्ट करतात आणि त्यांना जर आपण झिडकारले तर त्यांच्यावर विपरीत परिणाम होऊन त्याचे परिणाम लगेच दिसून येत नसले तरी कालांतराने ते दिसून येतात. दिवसातून आपण त्यांना थोडा वेळच देऊ शकतो म्हणून अति लाड केल्यास त्याचेही विपरीतच परिणाम त्यांच्यावर होत असतात. या सर्व गोष्टींचा दोघांनीही विचार करावयाचा आहे.

वडिलोपार्जित इस्टेट सर्वांनाच मिळते असे नाही पण जर असली तर नाकारण्यात काही शहाणपण नाही. अशी इस्टेट जर जमीन असेल तर सांभाळण्यासाठी सतत तलाठी, मामलेदार कचेरी अथवा इतर अनेक सरकारी कामांसाठी धावपळ करावी लागते आणि इस्टेटीतील हिस्सा तर पाहिजे पण धावपळ मात्र मला जमणार नाही अशी वृत्ती प्रत्येकाची असते. हा प्रसंग जर अनेक हिस्सेदार असल्यास जाणवत असतो. एकच व्यक्ती असल्यास प्रश्नच येत नाही. पण जर अनेक असले तर सर्वांनी एकत्र बसून यावर विचार करुन असे काम करण्यास जो तयार असेल त्याची उपजीविका चालेल एवढा हिस्सा त्याला द्यावा. अन्यथा अशी इस्टेट विकून त्यातून येणारा पैसा समान वाटून घ्यावा व पुढील विकोपास जाणारे अनर्थ टाळावे हाच सर्वोत्तम उपाय होय.

सर्वसंमतीने जर सहजपणे वडिलोपार्जित मदत मिळत असेल तर अवश्य घ्यावी. कारण कर्ज घेतल्यावर ते जर वेळेवर फेडू शकलो नाही तर जप्ती येऊन मानहानी होण्याचा प्रसंग येऊ शकतो. वडिलोपार्जित मदत घेतल्यास हा प्रसंग येऊ शकत नाही. संसार करताना हे प्रत्येकाने लक्षात ठेवावे की, आईबाबांचे घर हेच आपल्या सोयीचे आहे. कोणीही कितीही गप्पा मारल्या तरी आईचे प्रेम ते आईचेच प्रेम. पैशांची अपेक्षा न ठेवता एखादी स्त्री तुमच्या मुलाला सांभाळायला तयार असेल तर मात्र काही प्रमाणात ती आईचे प्रेम देऊ शकेल. पाळणाघरात जर मुलांची संख्या दोन/चार असेल तर काही प्रमाणात असे प्रेम त्यांना मिळू शकेल, पण शक्यता फारच कमी. केवळ नाईलाज असेल तरच याचा आसरा घ्यावा.

एकत्र कुटुंब पद्धत असेल तर एखाद्या गोष्टीत निर्णय काय घ्यावा हा प्रश्न निर्माण होतो. त्यातून वाद निर्माण होण्याची शक्यता अधिक असते. त्यामुळे नाजूक परिस्थिती निर्माण होऊन कुटुंबेच्या कुटुंबे उध्वस्त झालेली आहेत. यासाठी कोणीही कोणावर न लादता कुटुंबातील सर्वांनी एकत्र बसून सर्वमान्य असा तोडगा त्यातून निघू

शकतो. मला देखील घरात मान दिला जातो ही भावना प्रत्येकाच्या मनात निर्माण होते व त्यातून होणारे निष्पन्न नक्कीच सर्वांना लाभकारी ठरते.

जर एखाद्याला कायमस्वरूपाची मोठ्या पगाराची नोकरी नुकतीच लागली असेल आणि जर त्याचे लग्नाचे वय जास्त झाले असेल पण जवळ काहीच शिल्लक नाही तर त्याने कर्ज काढून जरूर लग्न करावे. पण नोकरी नाही, लवकर मिळण्याची शक्यता नाही अगर ती मिळेपर्यंत वडिलोपार्जित संपत्तीवर हा सर्व गाडा चालवू शकू अशी परिस्थिती नसेल तर लग्नावाचून थांबणेच बरे.

जर एखाद्याला कायमस्वरूपाची मोठ्या पगाराची नोकरी नुकतीच लागली असेल आणि जर त्याचे लग्नाचे वय जास्त झाले असेल पण जवळ काहीच शिल्लक नाही तर त्याने कर्ज काढून जरूर लग्न करावे.

आजकाल लग्न करताना पत्रिका बघण्यात येते आणि त्यात पत्रिका बघणाऱ्याने जर काही अडचणी उद्धवतील असे सांगितले तर त्यावर विश्वास न ठेवता तीच पत्रिका दुसऱ्या ज्योतिष्याला दाखविली जाते. येथे पहिल्यापेक्षा वेगळे काही ऐकायला मिळाले की नवा ज्योतिषी आहेच. येथे एक गोष्ट असते, एक तर जन्माची अचूक वेळच लिहिलेली नसते किंवा अभ्यास तरी कमी पडतो. यासाठी माझे मत असे आहे की, जो सर्व साक्षी प्रभू ज्याने या ब्रह्मांडातील सर्व तारे, सर्व ग्रह, सर्व नक्षत्रे निर्माण केली आहेत त्याला शरण जाऊन, माझे मागील आयुष्य विसरून यापुढे मी 'सत्यं शिवं सुंदरम्' या गोष्टीवर पूर्ण विश्वास ठेवून यापुढील आयुष्य व्यतीत करीन असा निश्चय करून जगावे, तो नक्कीच यशस्वी होईल.

मात्र लग्न हे धार्मिक विधीनेच व्हावे. या विधीमागे एक खोल असा अर्थ दडलेला आहे. शास्त्रांचा पूर्ण अभ्यास करूनच आपल्या पूर्वजांनी हे विधी निर्माण केले आहेत. त्यांचे विचार डावलल्यामुळेच समाज आज भरकटत चाललेला आहे. वैफल्यग्रस्त जीवन समाज जगत आहे.

### सत्तावीस मजली

एका झोपडपट्टी असलेल्या जागी उत्तुंग उभ्या राहिलेल्या इमारती समोरून जात असता मनांत आलेले विचार. एक कामगार - त्या उंच इमारतीत काम करणारा, त्या इमारतीपाशी परत आल्यावर त्याला आलेला अनुभव

बांधीत होतो येथे मजले सत्तावीस।<br>
परी आज नाही राहिली सत्ता आत जाण्यास।।<br>
म्हणतात मला तुमची जागा नव्या झोपडपट्टीत।<br>
जोवर आम्ही नाही बांधत तेथे मजले अठ्ठावीस।।

- चिंतामण महादेव (पृ.२२२),<br>
लालबाग, मुंबई

जेवणाची पंगत हाच प्रकार योग्य आहे. यात लहान थोर असे सर्व एकत्र बसून जेवतात. सर्वसाधारण लहान मुले कमी जेवतात आणि पंगतीत त्यांना विचारून वाढले जाते. यामुळे अन्नाची होणारी नासाडी कमी होते. बुफेमध्ये अनेक तोटे असतात. गर्दी वाढली तर मला पुन्हा हा पदार्थ मिळेल का नाही या शंकेपोटी मी पानात अधिक वाढून घेतो व न खपल्यास टाकून देतो. दुसरे म्हणजे मला एखादा पदार्थ आवडतो. उच्चभ्रू समाजातील लोक मला हसतील या भीतीने मी उपाशी देखील राहतो.

लग्न केल्यावर फॅमिली प्लॅनिंग हा प्रकारच गैर आहे. आपले मन मारून तरुण/तरुणी एकत्र राहू शकत नाहीत. यासाठी सांप्रत काळात अनेक साधने निर्माण झाली असली तरी त्यातून न्यूनगंड निर्माण होऊ शकतो आणि त्याचा अतिरेक झाल्यास वैफल्यग्रस्तता येऊ शकते. म्हणून संसार करताना पैशाला जरूर तेवढेच महत्त्व देऊन, पत्नी ही घरातील मोलकरीण नाही व पती हा घरातील रामा गडी नाही अशा उदात्त विचाराने, कोणतीही गोष्ट एकमेकांपासून लपवून न ठेवता दोघांनीही संसार केल्यास तो नक्कीच यशस्वी व एकमेकांना लाभकारी होईल यात शंकाच नसावी.

* * *

# एका मारवाड्याच्या नजरेतून महाराष्ट्रीय

- गिरीश प. जाखोटिया, विलेपार्ले, मुंबई. फोन : २६१८५९५९

*गिरीश जाखोटिया हे पुण्यातील दत्तात्रय काशिनाथ (पृ.१२८) यांचे जावई. सोलापूरला सारे शिक्षण मराठीत. जन्माने मारवाडी असले तरी सवयींनी-संस्कारांनी बऱ्यापैकी मराठी.*

*लग्नापासून गेली २० वर्षे दोन्ही समाज जवळून पाहिले आहेत. त्यांची निरीक्षणे व अनुभव यांचे चिकित्सक विश्लेषण करणारा दीर्घ लेख त्यांनी 'अंतर्नाद'च्या सप्टेंबर २००५ च्या अंकात लिहिला. त्यातील निवडक मजकूर सूत्ररूपाने इथे दिला आहे. संपूर्ण लेख मुळातूनच वाचण्याजोगा आहे. - संपादक*

थोडक्या शब्दांत 'मराठी माणूस' मांडायचा म्हटल्यास, असे म्हणू शकतो की 'भावनाशील नि भिडस्त, साधारणपणे हुशार पण साधेपणाने बावळट, बव्हंशी प्रामाणिक नि म्हणून बहुतेक वेळा अडचणीत येणारा, बऱ्यापैकी सुसंस्कृत पण म्हणून छोट्या-छोट्या, आनंदी भूतकाळामध्ये रमणारा आणि मोठी महत्त्वाकांक्षा नसलेला, चौकटप्रिय माणूस.' अर्थात, मराठी माणसाचे हे झाले सरधोपट 'जनरलायझेशन'. आजच्या बुद्धिमान, महत्त्वाकांक्षी मराठी युवकांना हे लागू व्हायचे नाही.

मराठी माणूस भ्रष्टाचाराच्या बाबतीत आजही बऱ्यापैकी संकोची असतो.

एका विशिष्ट आकारास पोचल्यानंतर मराठी उद्योगपती बावचळतो - अडखळतो - गोंधळतो वा घाबरतो. हे असे होण्याची पाच महत्त्वाची कारणे मला वाटतात. पहिले कारण असते ते 'पुढचा मोठा टप्पा' हाताळलेल्या मराठी उदाहरणांची वानवा. दुसरे कारण म्हणजे स्वतःच्या मराठी कर्मचाऱ्यांच्या कुवतीबाबत असणारा अविश्वास. मारवाडी उद्योगातील

मारवाडी कर्मचाऱ्यांच्या तुलनेत मराठी उद्योगातील मराठी कर्मचारी 'हा उद्योग माझाच' या समरसतेने काम करीत नाहीत. अल्पसंतुष्टता हे तिसरे कारण 'मराठी' उद्योजकांचा ऱ्हास होण्यास कारणीभूत आहे. शंभर कोटींचा व्यापार हजार कोटीपर्यंत नेण्याची एक उद्योजकीय भूक असावी लागते. अशी भूक, अशी नशा, अशी महत्त्वाकांक्षा बहुतेक मराठी उद्योगपतींकडे नसते. चौथे कारण सर्वाधिक महत्त्वाचे. काथ्याकूट, वादविवाद, अस्मितादर्शन इ. निवडक गोष्टी सोडल्यास मराठी माणसाला मी कधी आक्रमक होताना पाहिलेले नाही. व्यापार-उद्योग इ. गोष्टी कित्येक शतके 'लवचीक सचोटी'नुसार चालतायत. (ह्यास देश, जात, धर्म, रंग वगैरे कुठलेही अपवाद नाहीत!) 'भ्रष्टाचार' हा 'भयानक' शब्द असल्यामुळे हल्ली मी 'लवचीक सचोटी' (Ethical Flexibility) हा शब्दप्रयोग करीत असतो.

अन्य उद्योजकांकडून स्पर्धेत मार खाण्याचा 'मराठी' तोचतोचपणा हा अशी लवचीक सचोटी वापरता न आल्याने होत असतो, असे माझे स्पष्ट, प्रामाणिक अन् ठाम मत आहे. आता ही 'लवचीक सचोटी' म्हणजे काय? महाभारतकालीन संदर्भ द्यायचा म्हणजे 'नरो वा कुंजरो वा'. आज या प्रचलित सिद्धान्ताची उदाहरणे विविध स्वरूपात सापडतील. 'तुटेन पण वाकणार नाही' हा मराठी बाणा लवचिकतेच्या अंगाने जात 'वाकेन पण तुटणार नाही' असा स्थलकालव्यक्तिपरत्वे बदलायला हवा. कृष्णाची 'कृष्णनीती' हेच सांगते. लवचीक व्हा, डोला, वाका, शत्रूस घाफील करा नि मग त्यास जिंका. राग, स्वाभिमान, अस्मिता, अभिमान इ. साऱ्या गोष्टी महत्त्वाच्या आहेतच. पण त्यांच्याही आधी आमचे 'अस्तित्व' जास्त महत्त्वाचे.

मला अन्य जातीय लोकांपेक्षा मराठी माणसाशी व्यवहार करायला अधिक आवडतो. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे 'विश्वासार्हता'. मी बऱ्याचदा माझ्या मारवाडी मित्रांना सांगत असतो, की तुमच्या उद्योगात 'सचोटी'चा कर्मचारी वा भागीदार हवा असेल, तर मराठी माणसाला प्राधान्य द्या. मराठी कर्मचारी वा भागीदार अतिमहत्त्वाकांक्षी वा कावेबाज नसतो.

**सिलिकॉन व्हॅलीमधील मराठी मुलांचा पराक्रम अगदी वाखाणण्याजोगा आहे.** पण यातून काही निष्कर्ष निघतात. उत्तम, सरळ, स्पष्ट वातावरणात मराठी मन अधिक उमलते. काम करण्याची उमेद वाढते. अंगीभूत गुणांचे प्रगटीकरण अधिक सहजपणे होते. या मराठी मनांनी सिलिकॉन व्हॅलीमध्ये वा ऑस्ट्रेलियात वा अन्य टिकाणी जे पराक्रम गाजविले ते 'सिस्टिमिक सपोर्ट' मुळेच. म्हणजे 'सिस्टिम' खडतर असेल वा क्लिष्ट किंवा भ्रष्ट असेल तर भावुक मराठी मन त्या सिस्टिमचा पुरेसा मुकाबला करू शकत नाही.

**आजचा मराठी युवक नि युवती जुनी जोखडे बाजूला सारू पाहताहेत.** उद्योजकीय कर्मचारी होण्यासाठी लागणारी स्वभावातील, वेळापत्रकातील आणि परस्परसंबंधांमधील लवचिकता आजचा मराठी युवक समंजसपणे स्वत:च्या स्वभावात भिनवू पाहतोय, मोठी स्वप्ने, उत्तम राहणीमान, काहीतरी वेगळे करून दाखवायची जिद्द आजची मराठी पिढी दाखवते आहे; हा ठळक बदल इथे नमूद करावाच लागेल. अर्थात, अजूनही मोठा पल्ला गाठायचाय. इतरांची संधी 'स्पर्धक' म्हणून बळकाविण्याचा आक्रमकपणा, स्वत:ची प्रसिद्धी स्वत:च करण्याचा निगरगट्टपणा आणि स्वत:च्या कामाची किंमत ठणठणीतपणे मागण्याचा हिशेबीपणा आता महत्त्वाकांक्षी मराठी पिढीने दाखवायला हवा.

आज मराठी वाचक अर्थविषयक व विज्ञानविषयक गोष्टी आवर्जून वाचू लागला आहे. अर्थ आणि विज्ञानासंबंधित चर्चा, संमेलने, प्रदर्शने इ. गोष्टींना मराठी जनांची गर्दी आता लक्षणीय वाटते. श्रीमंत, समर्थ, प्रगल्भ महाराष्ट्राच्या घडणासाठी हे आवश्यकच आहे. मुंबईत गिरगाव, दादर, पार्ले, गोरेगाव, मुलुंड नि बोरिवली इ. ठराविक उपनगरांमध्ये अशी चळवळ उमेदशील मराठी माणसे चालवताहेत. पण या गर्दीला आता आखीवरेखीव असे संस्थात्मक चळवळीचे स्वरूप यायला हवे. राजकीय पुढारी नि तथाकथित समाजसुधारक यांनी या चळवळीचा ताबा घेऊ नये, म्हणजे मिळवले.

पार्ल्याचे असे काही विशेष 'मराठी' फायदे आहेत. अगदी थालीपिठापासून ते अत्रे कट्ट्यापर्यंत. **हे सारे फायदे घेत असतानाच माझ्यातला 'व्यवहारी मारवाडी' जागरूक असतो.** म्हणजे नाटक-गप्पा-गाण्यांची मैफल इ. गोष्टी होत असताना **आर्थिक बाजूही भक्कम करीत जाणे, हे आवश्यक आहे.** गप्पांना आवरते घेण्याची सवय म्हणूनच प्रत्येक 'बोलघेवड्या' मराठी माणसाने लावून घेतली पाहिजे. खळखळून हसणे नि समरसून जगणे जर भविष्यातही घडायला हवे असेल, तर वर्तमान आणि भविष्याबद्दल भावुकता थोडी बाजूला ठेवून प्रत्येक मराठी माणसाने जागरूक व्हायला हवे.

***

---

खुशीपत्र

## 'बंगाली बाबू'

जूनचा 'हितगूज' आला. हा संमेलन विशेषांकच होता. अहवाल वाचता वाचता मलाच काही त्रुटी जाणवल्या. मुख्य म्हणजे मंडप सजावट आणि डोळ्यासमोर उभे राहिले 'बंगाली बाबू', शेजारी ग्रामस्थ, बाळूकाका सगळेच.

अहोरात्र खपून संमेलन मंडप तयार करण्याची किमया यांचीच. त्या दिवसात नेमका सतत संध्याकाळचा पाऊस पडत असताना, सकाळी शेणाने सारवलेली जमीन संध्याकाळी आलेल्या पावसाने वाहून जायची. अशा स्थितीतही अत्यंत उत्कृष्ट अशी परिसराशी नाते सांगणारी सजावट, तिथल्याच परिसरातील उपलब्ध वस्तूतून सुंदर अशा कलाकृती - उदा. अनोखा असा आकर्षक स्वागत कक्ष, सांतेरी मंडप, लं. पां. उर्फ बाबा मराठे मंडप, स्टेज सजावट. सगळेच अप्रतिम 'परिसरातून सुशोभनच' जणू. सर्व बिंबलवासियांचे कौशल्यच तिथे साकार झालेले आणि याची कल्पना चित्रित करणारे एकमेव 'बंगाली बाबू' उर्फ सुरेश शंकर हे कलाकार बांधव. खरोखरच अवर्णनीय. संमेलन यशाचा हाच खरा भाग नसेल कशावरुन!

**- सौ. शुभदा दीपक** (पृ.५३३),
शिरोडा-गोवा.

# सिमेंट रेती ते रुमाली रोटी

- **गौरी श्रीकृष्ण** (पृ.३५८), डोंबिवली

''धंदा करावा तो मारवाड्याने, हॉटेल चालवावे ते शेट्टीने'' हे विधान एका मराठी माणसाने साफ खोटं पाडलं आहे. डोंबिवली येथील **'स्पाइस आर्ट' हॉटेलचे मालक श्रीकृष्ण मराठे**. हे या विधानाला अपवाद ठरवणाऱ्या पैकी एक.

**श्रीकृष्ण** मराठे हे सोमैया महाविद्यालयाचे बी.एस.सी. केमिस्ट्रीचे विद्यार्थी. जन्म १९५७. शिक्षण घेत असताना त्यांनी आर.सी.एफ. मध्ये नोकरी धरली. काहीतरी वेगळं करण्याची महत्त्वाकांक्षा, जिद्दी स्वभाव असल्याने त्यांनी 'फ्रेम' च्या व्यवसायाला सुरवात केली. काही दिवस हा व्यवसाय चालू होता. पुढे त्यांनी बांधकाम व्यवसायाला सुरवात केली. दिवसभर व्यवसाय सांभाळून रात्री ते आर.सी.एफ. मधील नोकरीही करत होते. नंतर नोकरीतून स्वेच्छा निवृत्ती घेऊन त्यांनी बांधकाम व्यवसाय स्वतंत्रपणे सुरू केला. आज डोंबिवली येथील त्यांनी बांधलेल्या इमारती, बंगले हे त्यांच्या यशाचे स्तंभ आहेत.

हा व्यवसाय सुरू असतानाच हॉटेलची संकल्पना त्यांच्या मनात रुजली. आज डोंबिवली येथील मिलापनगर येथे 'स्पाइस आर्ट' नावाचे शुद्ध शाकाहारी हॉटेल यशस्वीपणे सुरू आहे. पंचतारांकित रेस्तराँमध्ये अनुभव असलेला शेफ 'सुबोध झारे' हे या रेस्ताराँचे चीफ शेफ आहेत. आजच्या तरुण पिढीची आवड लक्षात घेऊन या हॉटेलची रचना केली आहे.

आज श्रीकृष्ण मराठे यांच्या संपूर्ण व्यवसायामुळे पन्नासहून अधिक लोकांना रोजगार उपलब्ध झाला आहे. घरात कुठल्याही प्रकारची व्यवसायाची पार्श्वभूमी नसतानाही आपल्या हिंमतीवर मराठे यांनी व्यवसाय यशस्वीपणे सांभाळला आहे. ते देवधर्मासाठीहि वेळ देतात. आळंदी येथील 'नृसिंहसरस्वती स्वामीं'च्या मठाचे ते मुख्य ट्रस्टी आहेत.

पैसा मिळवणे हा एकमेव हेतु न ठेवता त्यांनी आपल्या बरोबर आपल्या स्टाफचाही विकास घडवून आणला आहे. योग्य गोष्टीसाठी योग्य माणसाची निवड व योग्य माणसाला योग्य संधी देण्याची वृत्ती हेच त्यांच्या यशाचे रहस्य.

चाकोरी बाहेरची त्यांची ही 'बिझनेस' संकल्पना आजच्या तरूण पिढीला योग्य मार्गदर्शक ठरू शकेल.

* * *

## 'सुनामी'चं संकट

*सुनामीग्रस्त विभागात (केरळमधील) दौरा करीत असतांना एका जमीनदोस्त झालेल्या घराच्या समोरील अंगणात एक स्त्री नारळाच्या झाडाला टेकून विनमस्क अवस्थेत बसलेली आढळली. तिला पाहून सुचलेली ही कविता -*

नाही राहिले घर माझे मी न राहिले त्याची.
उध्वस्त झाले विश्व सारे भिंत न उरली वास्तूची.
नुसती जमीन अन् आकाश न्याहाळी मम दृष्टी.
सोबत आहे अंगणी मात्र हया माडाच्या झाडाची.
'सुनामी' लाटांनी केला विस्कळित हा आसमंत.
उकळता सागर तेव्हाचा आता पहा झालाय शांत.
कसे झाले कां झाले नव्हते कळले भाकित
वाहून गेले कुटुंब सारे कां मीच राहिले जीवित ?
कोण उभारेल भिंती अन् देईल जरा आडोसा ?
कोण दावेल माणुसकी अन् देईल जरा दिलासा ?
सोसणे भाग आहे जे आले आहे पुढती
पण नजर शोधले जरा मम लेकराच्या आकृती
गुंजतील कानांत हसण्या बोलण्याचे ध्वनी
असतील सोबतीला उरी दाटलेल्या आठवणी.

**- डॉ. सौ. सीमा शाम** (पृ.४११), पुणे

## महा-भूकंपांचा भयानक इतिहास

संग्राहक - **मोहन सदाशिव** (पृ.३६५), खार, मुंबई

| इ.स. | ठिकाण | मृतांची संख्या |
|---|---|---|
| १२९० | होपे प्रांत, चीन | १००००० |
| १५५६ | शेन्सी प्रांत, चीन | ८३०००० |
| १७२७ | कोलकाता, भारत | ३००००० |
| १९२० | कान्सु प्रांत, चीन | २००००० |
| १९२३ | टोकयो-योकोहामा, जपान | १४२८०२ |
| १९७६ | होपे प्रांत, चीन | २४०००० |

* * *

हसरे हितगुज

## अजब शक्कल

मी पायाच्या अपघातामुळे सार्वजनिक हॉस्पिटलमध्ये होतो. माझ्याकरिता ठेवलेल्या नर्सने स्वत:ची युरीन मला न सांगता, बाटलीवर माझे नाव घालून तपासायला पाठविली. रिपोर्ट माझ्याकडे आल्यावर मी चकित झालो. कारण माझी युरीन तपासण्यासाठी दिलीच नव्हती. त्यावर नर्सने खुलासा केला की, लवकर रिपोर्ट मिळावा म्हणून ही शक्कल तिने लढविली. मी तिला म्हणालो ''नशीब यावेळी तू प्रेग्नन्सी टेस्ट करता युरीन पाठवली नव्हतीस. नाहीतर पॉझिटिव्ह रिपोर्ट आला असता, आणि माझ्यावर शस्त्रक्रिया होऊन मी सौ. मराठे म्हणून हॉस्पिटलमधून बाहेर पडलो असतो.''

**- गजानन भास्कर** (पृ.४२७), घाटकोपर, मुंबई


*आजोबा हरि प्रभाकर मराठे*
*(१८८९ ते १९६३)*
*यांच्या स्मरणार्थ*

**प्रभाकर दामोदर मराठे,**
वडाळा, मुंबई - ४०० ०३१.



## या अंकात


१. **मराठे प्रतिष्ठान डायरीबाबत निवेदन**............ पृ.१
सौ. नीलांबरी मराठे, पुणे

२. **डायरी प्रकाशन व वर्धापन दिन समारंभ**......... पृ.१
पुणे शाखेतर्फे जाहीर निमंत्रण

३. **आवाहन : 'रक्ताचे' नाते जोडूया**............... पृ.१
महेश अनंत मराठे, पुणे

४. **म. प्र. वेबसाईटचा उपयोग**.................... पृ.२
प्र. ना. कुलकर्णी, ठाणे

५. **चिंतामणि बळवंत हस्ताक्षर स्पर्धा**............... पृ.३
गजानन चिंतामणि मराठे, पुणे

६. **'व्हीके' असे सापडले**......................... पृ.५
वामन गणेश मराठे, जोगेश्वरी, मुंबई

७. **कुलवृत्तान्त घराणेवार छापावा**.................. पृ.६
महेश अनंत मराठे, मुलुंड, मुंबई

८. **आयत्यावेळचा अध्यक्ष**......................... पृ.११
वामन गणेश मराठे, जोगेश्वरी, मुंबई

९. **होय, मला लग्न करायचंय**..................... पृ.१२
सुनील सदानंद विद्वांस, मुद्देबुद्रुक, कर्जत

१०. **सत्तावीस मजली (कविता)**..................... पृ.१३
चिंतामणि महादेव मराठे, लालबाग, मुंबई

११. **एका मारवाड्याच्या नजरेतून महाराष्ट्रीय**......... पृ.१३
गिरीश प. जाखोटिया, विलेपार्ले, मुंबई

१२. **सिमेंट रेती ते रुमाली रोटी**..................... पृ.१५
गौरी श्रीकृष्ण मराठे, डोंबिवली

१३. **'सुनामी'चं संकट (कविता)**................... पृ.१५
डॉ. सौ. सीमा शाम मराठे, पुणे

१४. **महा-भूकंपांचा भयानक इतिहास**............... पृ.१५
मोहन सदाशिव मराठे, खार, मुंबई


याशिवाय **प्रतिष्ठान वृत्त** (पृ.२,५,६), **सभासद वृत्त** (पृ.३ ते ५), **हसरे हितगुज** (पृ.१२,१५) आणि **खुषीपत्रे** (पृ.४,१४) **ही नेहमीची सदरे.**

**बुक पोस्ट**

प्रति


**मराठे प्रतिष्ठान**
मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग,
प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.
(टे. नं. ४३०२४५३)